23 July 2026 page 02_Layout 1 22-07-2026 05:47 PM Page 1



## बहुजन सौरभ संपादकीय

# संसद की रस्ता? राहुल गांधींसमोर पर्याय कोणता?

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी काँग्रेस आणि सहयोगी पक्षांच्या खासदारांसह केलेल्या आंदोलनाने भारतीय लोकशाहीसमोर एक महत्त्वाचा प्रश्न उभा केला आहे. वृत्तानुसार, संसदेत सातत्याने मांडण्यात येणाऱ्या मागण्यांकडे सरकारकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत राहुल गांधी आणि इतर खासदारांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अधिकृत निवासस्थानासमोर शांततापूर्ण आंदोलन केले. त्यानंतर पोलिसांनी राहुल गांधी आणि इतर खासदारांना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात नेल्याची घटना घडली. या घटनेकडे केवळ राजकीय संघर्ष म्हणून न पाहता लोकशाहीच्या दृष्टीने विचार करण्याची गरज आहे. प्रश्न असा आहे की, जेव्हा विरोधी पक्षाची भूमिका संसदेत ऐकली जात नाही, तेव्हा त्यांच्यासमोर कोणता लोकशाही मार्ग उरतो? संसदीय लोकशाहीमध्ये विरोधी पक्ष हा सत्ताधाऱ्यांचा शत्रू नसतो. तो लोकशाहीचा एक अत्यंत महत्त्वाचा स्तंभ असतो. सरकारच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करणे, जनतेच्या समस्या मांडणे, धोरणांवर टीका करणे आणि सत्तेला उत्तरदायी ठेवणे ही विरोधी पक्षाची घटनात्मक जबाबदारी आहे. सत्ताधारी आणि विरोधी पक्ष यांच्यातील मतभेद हे लोकशाहीचे लक्षण असते; मतभेदांना दडपणे नव्हे तर त्यावर संवाद साधणे हे लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे. काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांचा आरोप आहे की, संसदेत त्यांनी उपस्थित केलेल्या अनेक गंभीर विषयांवर चर्चा होऊ दिली जात नाही. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी अनेक महत्त्वाच्या चर्चांमध्ये सहभागी होत नाहीत किंवा विरोधकांच्या प्रश्नांना थेट उत्तर देत नाहीत, अशी त्यांची तक्रार आहे. दुसरीकडे सरकारचे म्हणणे असे असू शकते की, संसदेचे कामकाज नियमांनुसार चालते आणि विरोधकांनीही संसदीय शिस्त पाळली पाहिजे. त्यामुळे या प्रश्नाच्या दोन्ही बाजू समजून घेणे आवश्यक आहे. परंतु जर विरोधी पक्षाला सातत्याने असे वाटत असेल की संसदीय मार्ग प्रभावी राहत नाही, तर त्यांच्यासमोर शांततापूर्ण लोकशाही आंदोलन हा पर्याय उरतो. भारतीय राज्यघटनेच्या कलम १९ अंतर्गत नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शांततापूर्ण सभा घेण्याचा आणि संघटना स्थापन करण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे. अर्थात, हे अधिकार सार्वजनिक सुव्यवस्था, सुरक्षा आणि कायद्याच्या चौकटीच्या अधीन आहेत. भारतीय लोकशाहीचा इतिहास पाहिला तर आंदोलनाची परंपरा अत्यंत समृद्ध आहे. महात्मा गांधी यांनी सत्याग्रह आणि अहिंसेच्या माध्यमातून ब्रिटिश साम्राज्याला आव्हान दिले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाडचा चवदार तळे सत्याग्रह, नाशिकचा काळाराम मंदिर प्रवेश आंदोलन आणि सामाजिक न्यायासाठी विविध लोकशाही चळवळी उभारल्या. जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या आंदोलनानेही भारतीय राजकारणाला नवी दिशा दिली. या सर्व आंदोलनांचा आधार लोकशाही, अहिंसा आणि घटनात्मक मूल्ये हाच होता. राहुल गांधी आणि इतर खासदारांना आंदोलन स्थळावरून पोलिसांनी ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात नेल्यामुळे अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. काँग्रेस आणि तिच्या समर्थकांच्या मते हा विरोधी पक्षाचा आवाज दडपण्याचा प्रयत्न होता. तर सरकार आणि प्रशासनाच्या दृष्टीने प्रधानमंत्रींच्या निवासस्थानाची सुरक्षा, कायदा आणि सुव्यवस्था राखणे ही प्राथमिक जबाबदारी असल्याने अशी कारवाई आवश्यक होती, असा युक्तिवाद केला जाऊ शकतो. त्यामुळे या घटनेकडे भावनिक नव्हे तर वस्तुनिष्ठ दृष्टीने पाहण्याची गरज आहे. मात्र, यापलीकडे एक मूलभूत प्रश्न कायम राहतो. सरकार आणि विरोधी पक्ष यांच्यातील संवाद पूर्णपणे खंडित झाला, तर लोकशाहीची गुणवत्ता कमी होऊ शकते. संसद ही केवळ कायदे करण्याची संस्था नाही; ती संवाद, चर्चा, वादविवाद आणि उत्तरदायित्वाचे सर्वोच्च घटनापीठ आहे. तेथेच मतभेदांवर चर्चा होणे अपेक्षित असते. जर त्या घटनापीठावर संवाद कमी झाला, तर राजकीय संघर्ष रस्त्यावर येण्याची शक्यता वाढते. सर्वोच्च न्यायालयानेही विविध निर्णयांत शांततापूर्ण आंदोलनाचा अधिकार हा लोकशाहीचा महत्त्वाचा भाग असल्याचे स्पष्ट केले आहे. त्याचबरोबर सार्वजनिक सुव्यवस्था आणि इतर नागरिकांच्या अधिकारांचे संरक्षण करणेही तितकेच आवश्यक असल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले आहे. त्यामुळे अधिकार आणि जबाबदारी यांचा समतोल राखणे ही प्रत्येक लोकशाही व्यवस्थेची कसोटी असते. सरकारकडे स्पष्ट बहुमत असले तरी विरोधी पक्षाचे म्हणणे ऐकणे, चर्चेला वेळ देणे आणि महत्त्वाच्या राष्ट्रीय प्रश्नांवर संवाद साधणे ही लोकशाहीची अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे विरोधी पक्षानेही आंदोलन करताना संविधान, कायदा आणि सार्वजनिक सुव्यवस्थेचा आदर राखणे आवश्यक आहे. संघर्ष असू शकतो, पण तो घटनात्मक मर्यादांमध्येच असला पाहिजे. राहुल गांधी यांच्या राजकारणाशी सहमत असो वा नसावे, परंतु प्रत्येक नागरिकाने स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे. जर संसदेत विरोधकांचे म्हणणे ऐकले जात नसेल, चर्चेला पुरेसा वाव मिळत नसेल आणि संवादाचे मार्ग बंद होत असल्याची भावना निर्माण होत असेल, तर विरोधी पक्षाने कोणता घटनात्मक आणि लोकशाही मार्ग स्वीकारावा? लोकशाहीचे खरे सामर्थ्य सरकार किती शक्तिशाली आहे यावर अवलंबून नसते; तर सरकार टीका किती संयमाने ऐकते, विरोधी मतांचा किती आदर करते आणि मतभेदांवर संवादाद्वारे तोडगा काढण्याची किती तयारी दाखवते यावर अवलंबून असते. तितकेच, विरोधी पक्षानेही आपली भूमिका शांततेने, संयमाने आणि घटनात्मक पद्धतीने मांडणे आवश्यक असते. भारतीय लोकशाही अधिक मजबूत करण्यासाठी सत्ताधारी आणि विरोधी पक्ष या दोघांनीही संवाद, सहिष्णुता, संसदीय परंपरा आणि राज्यघटनेतील लोकशाही मूल्यांचा आदर राखणे अत्यावश्यक आहे. कारण सशक्त लोकशाही ही केवळ बहुमतावर नव्हे, तर मतभिन्नतेचा आदर, मुक्त संवाद आणि घटनात्मक संस्थांवरील विश्वास यांच्या भक्कम पायावर उभी असते. हेच भारतीय संविधानाचे सार आहे आणि याच मार्गाने लोकशाही अधिक सक्षम, समावेशक आणि उत्तरदायी बनू शकते.●●

## फाईव्ह एच

# पत्रकारितेला पूर्णत्वाकडे नेणारी नवी दृष्टी

पत्रकारिता म्हणजे केवळ घटनांची नोंद नाही. ती समाजाच्या अंतःकरणाचा आरसा आहे. शब्द माहिती देतात. ते विचार घडवतात. मूल्ये निर्माण करतात. समाजाची दिशा ठरवतात. त्यामुळे पत्रकारितेचे अंतिम ध्येय केवळ 'काय घडले?' एवढ्यावर थांबू शकत नाही. ती 'माणसाचे काय झाले?' आणि 'समाजाला कुठे जायचे आहे?' या प्रश्नांपर्यंत पोहोचली पाहिजे. आजची परंपरागत पत्रकारिता प्रामुख्याने Five W आणि One H या सूत्रावर उभी आहे. What, Why, Who, When, Where आणि How. या पद्धतीने घटना समजून घेण्याचा प्रयत्न केला जातो. त्यात How म्हणजे 'घटना कशी घडली?' हा एकच प्रश्न विचारला जातो. हा प्रश्न महत्त्वाचा आहे. कारण तो घटनामागील प्रक्रिया, कारणे आणि परिस्थिती समजून घेतो. परंतु बौद्ध दृष्टीने पाहिले. तर इतक्यावर सत्य पूर्ण होत नाही.

तथागत बुद्धांनी प्रत्येक गोष्टीकडे केवळ परिणाम म्हणून पाहिले नाही. त्यांनी दुःख, त्याची कारणे, त्याचे निरसन आणि परिवर्तनाचा मार्ग शोधला. म्हणून बौद्ध पत्रकारिताही घटनांच्या पृष्ठभागावर थांबत नाही. ती आत शिरते. ती माणसाच्या वेदना ऐकते. ती सत्याची कठोर परीक्षा घेते. ती समाजाला विवेकाने विचार करायला शिकवते आणि शेवटी उपचार व परिवर्तनाचा मार्ग दाखवते. यामुळेच बौद्ध पत्रकारितेत One H चे रूपांतर Five H मध्ये होते. ही केवळ संकल्पनेची वाढ नाही; तर पत्रकारितेच्या आत्म्याचा विस्तार आहे. या पाच 'एच'मुळे पत्रकारिता माहितीपासून प्रज्ञेकडे, प्रतिक्रियेपासून परिवर्तनाकडे आणि स्पर्धेपासून करुणेकडे प्रवास करते.

**पहिला एच आहे : १. घटना कशी घडली? (How did it happen?)** ही परंपरागत पत्रकारितेची मूलभूत पायरी आहे. कोणती घटना घडली? ती घडण्यामागील प्रक्रिया काय होती? निर्णय कोणी घेतले? चुका कुठे झाल्या? परिस्थिती कशी निर्माण झाली? या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधणे आवश्यक आहे. परंतु बौद्ध पत्रकारिता येथे एक महत्त्वाचा प्रश्न अधिक विचारते. ही घटना टाळता आली असती का? उदाहरणार्थ, एखादा पूल कोसळला. सामान्य पत्रकारिता सांगेल की निकृष्ट बांधकामामुळे पूल पडला. पण बौद्ध पत्रकारिता विचारेल. निरीक्षण कोणी केले नाही? भ्रष्टाचार कोठे झाला? निष्काळजीपणाची किंमत निरपराध लोकांनी का मोजली? पुढील दुर्घटना टाळण्यासाठी कोणते बदल आवश्यक आहेत? म्हणजेच, घटना ही अपघात नसते. ती अनेक निर्णयांची साखळी असते. त्या साखळीचा शोध घेणे म्हणजेच पहिले एच.

**२. दुःख कसे निर्माण झाले? (How did suffering emerge?)** ही बौद्ध पत्रकारितेची खरी ओळख आहे. सामान्य पत्रकारिता नुकसान मोजते. बौद्ध पत्रकारिता वेदना समजून घेते. एखाद्या दुर्घटनेत दहा लोक मृत्युमुखी पडले. एवढी माहिती अपुरी आहे. त्या दहा कुटुंबांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले. मुलांचे शिक्षण थांबले. वृद्ध पालक निराधार झाले. एका आईने तिचा मुलगा गमावला. एका मुलाने त्याचे भविष्य गमावले. ही त्या बातमीची खरी बाजू आहे. बुद्धांनी सांगितले की, दुःख समजल्याशिवाय मुक्तीचा मार्ग सापडत नाही. आजच्या माध्यमांमध्ये अनेकदा वेदना ही केवळ दृश्य बनते. कॅमेरे अश्रू टिपतात. पण अश्रूंचे कारण समजून घेत नाहीत. दुःखाला 'ब्रेकिंग



न्यूज' बनवले जाते. पण त्याच्या उपचाराची चर्चा होत नाही. बौद्ध पत्रकारिता माणसाच्या वेदनेला सनसनाटी बनवत नाही. ती त्याचा सन्मान करते. ती पीडित व्यक्तीला 'स्टोरी' मानत नाही; तर 'मानव' मानते. म्हणूनच दुसरा एच पत्रकाराला विचारतो. या घटनेमुळे किती स्वप्ने तुटली? किती मने उद्ध्वस्त झाली? किती लोक आजही निःशब्द रडत आहेत?

**३. सत्याची पडताळणी कशी करायची? (How can truth be verified?)** आजचे युग माहितीचे नाही. माहितीच्या अतिरेकाचे आहे. एका खोट्या संदेशाला लाखो लोक काही मिनिटांत पुढे पाठवतात. अफवा सत्यापेक्षा वेगाने धावते. सामाजिक माध्यमांवरील प्रचार, अर्धसत्य, बनावट चित्रफिती आणि कृत्रिम बुद्धिमत्तेने तयार केलेले दिशाभूल करणारे मजकूर समाजाला गोंधळात टाकतात. अशा काळात पत्रकारितेची पहिली नैतिक जबाबदारी म्हणजे सत्याची कठोर पडताळणी. बुद्धांनी कालाम सुत्त मध्ये सांगितले, 'फक्त ऐकले म्हणून मानू नका. परंपरा आहे म्हणून स्वीकारू नका. बहुसंख्य लोक म्हणतात म्हणून सत्य समजू नका. स्वतः तपासा, विचार करा आणि अनुभवाच्या कसोटीवर घासून मगच स्वीकारा. हीच आधुनिक तथ्य पडताळणीची सर्वोच्च नीती आहे. बौद्ध पत्रकारिता म्हणते, 'एका स्रोतावर विश्वास ठेवू नका. पुरावे तपासा. विरोधी बाजू ऐका. आकडे पडताळा. भावनांपेक्षा तथ्यांना प्राधान्य द्या. कारण सत्याशिवाय पत्रकारिता म्हणजे दिशाहीन जहाज होय. पत्रकाराची सर्वात मोठी संपत्ती त्याची लेखणी आहे. त्यापेक्षा महत्वाची त्याची विश्वासार्हता आहे.'

**४. समाजाने विवेकाने प्रतिसाद कसा द्यावा? (How can society respond wisely?)** आजच्या माध्यमविश्वात बातमी दिल्यानंतर पुढे काय घडते. याचा फारसा विचार केला जात नाही. एक उत्तेजक मथळा हजारो लोकांमध्ये भीती निर्माण करू शकतो. एक अपूर्ण माहिती समाजात द्वेष पसरवू शकते. एक अफवा दंगल घडवू शकते. एक खोटा प्रचार लोकशाही कमकुवत करू शकतो. म्हणून बौद्ध पत्रकारिता केवळ माहिती देत नाही. ती समाजाला विवेकाने प्रतिसाद द्यायला शिकवते. प्रतिक्रिया आणि प्रतिसाद यांत मोठा फरक आहे. प्रतिक्रिया भावनांनी चालते. प्रतिसाद विवेकाने चालतो. बुद्धांनी मध्यम मार्ग शिकवला. अतिरेक टाळण्याची शिकवण दिली. द्वेषाला द्वेषाने नव्हे, तर करुणेने उत्तर देण्याचा संदेश दिला. पत्रकारितेचे काम समाजाला पेटवणे नाही. समाजाला जागवणे आहे. लोकशाही केवळ मतदानाने टिकत नाही. ती विवेकपूर्ण नागरिकांमुळे टिकते. म्हणून चौथा एच विचारतो? ही बातमी समाजाला अधिक शांत, सजग आणि जबाबदार बनवते का?

**५. उपचार आणि परिवर्तन कसे घडवायचे? (How can healing happen?)** ही बौद्ध पत्रकारितेची सर्वोच्च पायरी आहे. संघर्ष दाखवणे आवश्यक आहे. अन्याय उघड करणे आवश्यक आहे. सत्तेला प्रश्न विचारणे आवश्यक आहे. परंतु एवढ्यावर पत्रकारिता संपत नाही. पत्रकारितेचा शेवट आशेवर झाला पाहिजे. उपायांवर झाला पाहिजे. परिवर्तनावर झाला पाहिजे. बौद्ध पत्रकारिता विचारते. दोन समाजघटकांमध्ये संवाद कसा वाढेल? जातीय तणाव कसा कमी होईल? स्त्री-पुरुष समानता कशी वाढेल? गरीबीवर कोणते उपाय आहेत? शिक्षण सर्वांपर्यंत कसे पोहोचेल? पर्यावरणाचे संरक्षण कसे होईल? लोकशाही अधिक सशक्त कशी बनेल? हा उपाय शोधण्याचा प्रवास म्हणजे उपचार होय. या उपचारातून

**बौद्ध पत्रकारिता-१४**



भूपेंद्र गणवीर
मो. 9850031019

घडणारे सामाजिक परिवर्तन म्हणजे बौद्ध पत्रकारितेचे अंतिम ध्येय होय. बुद्धांनी केवळ दुःख सांगितले नाहीत. त्यांनी त्यावर मार्गही दिला. त्याचप्रमाणे बौद्ध पत्रकारिताही केवळ समस्या दाखवत नाही. ती समाधानाच्या दिशेने समाजाला घेऊन जाते. यामुळे बौद्ध पत्रकारितेचे संपूर्ण सूत्र अधिक व्यापक स्वरूपात पुढे येते.

**पाच डब्ल्यूमध्ये - What Truth?** - सत्य काय? Why Suffering? - दुःखाचे कारण काय? Who Benefits/who Suffers? - कोणाला लाभ? कोणाला वेदना? What Consequences? - परिणाम काय? What Compassionate Solution? - करुणामय उपाय काय? यासोबत, पाच एच - How did it happen? - घटना कशी घडली? How did suffering emerge? - दुःख कसे निर्माण झाले? How can truth be verified? - सत्याची पडताळणी कशी करायची? How can society respond wisely?- समाजाने विवेकाने प्रतिसाद कसा द्यावा? How can healing happen? - उपचार आणि परिवर्तन कसे घडवायचे? ही दहा सूत्रे मिळून पत्रकारितेचे नवे तत्त्वज्ञान निर्माण करतात. ही केवळ वृत्तांकनाची पद्धत नाही. ती मानवी मूल्यांची पुनर्स्थापना आहे.

आज जगात माध्यमांवर अविश्वास वाढत आहे. सनसनाटीपणा, पक्षपातीपणा, खोटी माहिती, द्वेषपूर्ण प्रचार आणि व्यापारी स्पर्धेमुळे पत्रकारितेची नैतिक उंची कमी होत आहे. अशा वेळी बौद्ध पत्रकारिता हा पर्याय नसून आवश्यकता आहे. कारण ती सत्ता किंवा विरोधक यांची पत्रकारिता नाही. ती सत्याची पत्रकारिता आहे. ती धर्मप्रचाराची नाही. ती धम्माच्या नैतिक मूल्यांची पत्रकारिता आहे. ती केवळ प्रश्न विचारत नाही. ती समाजाला योग्य प्रश्न विचारायला शिकवते. ती केवळ दोष दाखवत नाही. ती परिवर्तनाची दिशा दाखवते. ती केवळ माहिती देत नाही. ती प्रज्ञा जागवते. ती केवळ वेदना दाखवत नाही. ती करुणा जागवते. ती केवळ विवेकाची भाषा बोलत नाही. ती विवेकाला सामाजिक कृतीत रूपांतरित करते. आज पत्रकारितेला सर्वाधिक गरज आहे ती वेगापेक्षा सत्याची, स्पर्धेपेक्षा संवेदनशीलतेची, प्रचारापेक्षा प्रामाणिकतेची आणि संघर्षापेक्षा करुणेची. ही चारही मूल्ये बौद्ध पत्रकारितेच्या केंद्रस्थानी आहेत.

म्हणूनच Five H ही केवळ संकल्पना नाही. ती पत्रकारितेच्या नव्या युगाची नैतिक घोषणा आहे. ही घोषणा सांगते की पत्रकाराचे काम घटना मांडून संपत नाही. त्याचे खरे कार्य तेव्हाच सुरू होते. जेव्हा तो सत्य शोधतो, दुःख समजून घेतो, तथ्यांची पडताळणी करतो, समाजाला विवेकाने विचार करायला प्रवृत्त करतो आणि परिवर्तनाचा मार्ग उजळून दाखवतो. बुद्धांच्या करुणा, प्रज्ञा आणि समतेच्या प्रकाशात घडणारी ही पत्रकारिता केवळ वृत्त देणारी राहत नाही. ती समाज घडवेल. ती केवळ इतिहास लिहिणार नाही, ती इतिहासाला मानवी मूल्यांची दिशा देईल. एका ओळीत बौद्ध पत्रकारितेचे सार असे मांडता येईल. 'घटना दाखवणे ही पत्रकारिता आहे. पण सत्य, करुणा, विवेक आणि परिवर्तनाकडे समाजाला नेणे ही बौद्ध पत्रकारिता आहे. तिची आज जगाला गरज आहे.'●●

# रुबल नागी आणि भारतीय विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य
## कला-आधारित शिक्षणाची क्रांतिकारी भूमिका

भारतातील शिक्षिका रुबल नागी यांना नुकताच जगातील उत्कृष्ट शिक्षिका म्हणून पारितोषिक मिळाले. त्यामुळे बहुजन सौरभच्या आपल्या वाचकांना त्यांचे शैक्षणिक मॉडेल समजून घेतले पाहिजे. भारतीय विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य सध्या गंभीर संकटात आहे. स्पर्धात्मक परीक्षांचा दबाव, उच्च अपेक्षा, सामाजिक-आर्थिक आव्हाने आणि सोशल मीडिया यामुळे अनेक विद्यार्थी चिंता, उदासीनता आणि तणावाने ग्रस्त आहेत. २०२५ च्या विविध अभ्यासानुसार, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये ३२-३७टक्के मध्यम ते गंभीर उदासीनता आणि चिंताग्रस्तता दिसून येते. आत्महत्या विचारणा आणि भावनिक असंतुलन हेही मोठे प्रश्न आहेत.अशा पार्श्वभूमीवर रुबल नागी यांचे कार्य एक आशेचा किरण आहे. २०२६ च्या Global Teacher पारितोषिकाने सन्मानित रुबल नागी यांनी कला आणि शिक्षणाच्या माध्यमातून केवळ ज्ञान देणे नव्हे तर विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि भावनिक विकासावर भर दिला आहे. त्यांच्या Rouble Nagi Art Foundation (RNAF) ने ८०० हून अधिक शिकवणी केंद्रांद्वारे लाखो वंचित मुलांच्या जीवनात बदल घडवला आहे.

**रुबल नागी : कलाकार ते शिक्षिका आणि समाजसेवक :** रुबल नागी यांचा जन्म ८ जुलै १९८० रोजी जम्मू-काश्मीरमध्ये झाला. त्यांनी राजकीय शास्त्राची पदवी घेतल्यानंतर लंडनच्या Slade School of Fine Art मध्ये ललित कला शिकल्या. मुंबईतील झोपडपट्ट्यांमध्ये काम करताना त्यांना दिसले की अनेक मुले कचरा आणि तुटलेल्या भिंतींमध्ये वाढत आहेत. यावर उपाय म्हणून त्यांनी “Living Walls of Learning” हा उपक्रम सुरू केला. त्यांच्या RNAF ने झोपडपट्ट्या आणि खेड्यांतील भिंतींवर शैक्षणिक भित्तिचित्रे (Educational Murals) काढली. या भिंतींवर साक्षरता, गणित, विज्ञान, स्वच्छता, पर्यावरण आणि सामाजिक मूल्ये शिकवली



जातात. २०२६ पर्यंत ८००+ केंद्रे, १००+ समुदाय आणि लाखो मुलांना फायदा झाला आहे.

**RNAF ची शैक्षणिक पद्धती आणि मानसिक आरोग्य :** RNAF ची पद्धत पारंपरिक रट्टा पद्धतीपासून वेगळी आहे. ती कला-आधारित शिक्षण (Art-Based Learning) वर आधारित आहे.

**भावनिक अभिव्यक्ती (Emotional Expression) :** चित्र काढणे, रंगवणे आणि क्रिएटिव्ह क्रियांमुळे मुले आपल्या भावना व्यक्त करतात. हे तणाव कमी करते आणि आत्मविश्वास वाढवते.

**Living Walls :** भिंतींवरील इंटरॅक्टिव्ह मुरल्स केवळ ज्ञान देत नाहीत तर उत्सुकता, आनंद आणि समुदायाची भावना निर्माण करतात.

**समग्र विकास :** लवचिक वेळापत्रक, कौशल्य विकास, ध्यान-योग आणि समुपदेशन यांचा समावेश. अनेक मुले कुटुंबातील अडचणींमुळे येतात; शिक्षक समुपदेशक आणि संरक्षक म्हणून काम करतात.

**आत्म-सन्मान आणि लचक :** कला माध्यमातून मुले यश मिळवतात, अपयश हाताळायला शिकतात आणि सामाजिक कौशल्ये विकसित करतात. संशोधनानुसार, कला-आधारित कार्यक्रम मानसिक आरोग्य सुधारतात, चिंता कमी करतात आणि रचनात्मक विचार वाढवतात. रुबल यांच्या मते, “जेव्हा मुले तयार केली जातात, तेव्हा ती केवळ शिकत नाही तर नेतृत्व करतात.” त्यांच्या केंद्रांमध्ये सुरक्षित, काळजीवाहक आणि उत्सुकतापूर्ण वातावरण तयार केले जाते, जे मानसिक आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

**भारतीय संदर्भात महत्त्व :** भारतात शैक्षणिक दबावामुळे अनेक विद्यार्थी मानसिक आरोग्याच्या समस्या बाळगतात. RNAF सारखे मॉडेल दाखवते की कला ही केवळ अतिरिक्त कार्यक्रम नव्हे तर मुख्य शिक्षण साधन आणि मानसिक आरोग्य उपचार आहे. हे विशेषतः वंचित आणि ग्रामीण भागात प्रभावी ठरते, जिथे पारंपरिक मानसिक आरोग्य सेवा मर्यादित आहेत.

**मन:स्वास्थ्याचा प्रवास**



प्रवीण गांगुर्डे
मो. 9890631933

रुबल नागी यांचा पुरस्कार केवळ त्यांच्या कार्याचा सन्मान नाही तर भारतीय शिक्षण व्यवस्थेला एक संदेश आहेः शिक्षणात कला, सहानुभूती आणि समुदाय सहभाग समाविष्ट करा. यामुळे विद्यार्थी केवळ परीक्षेत यशस्वी होणार नाहीत तर जीवनात लचकदार, आनंदी आणि सक्षम बनतील. रुबल नागी यांचे कार्य सिद्ध करते की मानसिक आरोग्य आणि शिक्षण एकमेकांपासून वेगळे नाहीत. कला-आधारित, समुदाय-केंद्रित दृष्टिकोनाद्वारे आपण भारतीय विद्यार्थ्यांच्या संकटावर मात करू शकतो. प्रत्येक शाळा, महाविद्यालय आणि समुदायाने या मॉडेलकडे पाहिले पाहिजे. रुबल नागींसारख्या व्यक्तींमुळे आशा निर्माण होते, एका भिंतीपासून सुरू झालेले कार्य आज हजारो जीवन बदलत आहे. भारतातील विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भवितव्यासाठी कला आणि मानसिक आरोग्याची काळजी यांचा समन्वय असणे आवश्यक आहे. ●●

# साद घालतो कबीर



खरे म्हणजे आपण कोणत्या कुळात...कोणत्या जातीत जन्म घ्यावा हे आपल्या हातात नसते. तरी पण बऱ्याच जणांना आपल्या कुळाचा, घराण्याचा मोठा अभिमान असतो. कर्तृत्वशून्य पण कुळ आणि जातीचा गर्व फार मोठा. तथागत बुद्धांनी तर स्पष्टच उपदेश दिला....

**न जटाहि न गोत्तेन**
**न जच्चा होति ब्राम्हणो**
**यम्हि सच्चं च धम्मो च**
**सो सुची सो च ब्राम्हणो**

जटा वाढवल्यामुळे गोत्र किंवा जन्मामुळे कोणी श्रेष्ठ म्हणजेच ब्राम्हण होत नसतो. तर ज्याच्यामध्ये सत्यता आहे, धम्म आहे तोच खरा शुद्ध आणि श्रेष्ठ. तथागत बुद्ध, संत कबीर, संत तुकाराम यांच्या काळातच काय आताच्या काळात सुद्धा उच्च कुळात किंवा जातीत जन्म घेतल्यामुळे गर्वाने छाती फुगवणारे बरेच जण असतात. म्हणूनच तर संत तुकारामांना म्हणावे लागले,

**बरे झाले देवा कुणबी केलो**
**नाहीतरी दंभेचि असतो मेलो**

संत कबीर या खोट्या श्रेष्ठत्वाच्या वृत्तीवर हल्ला चढवितात...

**ऊंचे कुल का जनमिया**
**करनी उंच न कोय**
**कनक कलश मद सो भरा**
**साधु निंदा सोय**

उच्च कुळात जन्म झाला म्हणून कोणी मोठा होत नसतो. मोठे होण्यासाठी कार्यकर्तृत्व असावे लागते. मौल्यवान असा सोन्याचा कलश आहे पण त्यात दारु भरलेली असेल तर कोणताही सज्जन त्या भांड्याचा सोन्याचा असला तरी आदर करीत नाही. तसेच साधु आहे पण तो आळशी आहे. तो झोपून राहत असेल तर त्या साधुला कोणी विचारत नाही.



प्रा. वसंत वावरे
मो. 9403304670

# सत्तेला झोप लागू न देणारे विचार



कदाचित आपण चुकीचे समजत होतो की सत्ता झोपलेली आहे. कारण झोपलेली सत्ता सकाळी ६:३० वाजता कशी काय उठू शकते? उपासमारीविरुद्ध लढणाऱ्या एका व्यक्तीला अटक करण्याचे आदेश ती इतक्या पहाटे कसे देऊ शकते? मी स्वतः आज सकाळी ९:३० वाजता उठलो आणि सोशल मीडियावरून सोनम वांगचुक यांच्या डिटेन्शनची बातमी समजली. मात्र मला सर्वात जास्त आश्चर्य याचे वाटले की, सत्ताधारी आपल्या उशाखालची झोप इतक्या लवकर सोडून उठले तरी कसे? ज्यांचा धर्मच फक्त झोपणे आहे, ते एवढ्या पहाटे जागे कसे झाले? मग मला वाटले... कदाचित शेकडो वेळा 'उपोषण, उपोषण, उपोषण' ऐकल्यानंतर त्यांच्या झोपेतही त्याची स्वप्ने पडू लागली असतील. जशी पूर्वी मनुस्मृती मानणाऱ्यांना पडायची. कदाचित शेकडो वेळा 'आंबेडकर, आंबेडकर, आंबेडकर' हे नाव ऐकल्यानंतर त्यांच्या स्वप्नांतही डॉ. बाबासाहेबांच्या विचारक्रांतीची दृश्ये दिसू लागली असतील. सत्ताधाऱ्यांना आता कदाचित डॉ. बाबासाहेबांच्या नावाच्या 'भुताची' चाहूल स्वप्नांत लागायला सुरुवात झाली आहे आणि हीच भीती त्यांना पहाटे ६:३० वाजता उठवते, घाबरलेल्या मनाने अटकेचे आदेश काढायला भाग पाडते. कारण त्यांना भीती आहे की, डॉ. बाबासाहेबांच्या विचारांची क्रांती पुन्हा एकदा जिवंत होऊ नये.●●



अतुल देशभ्रतार
मो. 9730603897

# आदिवासी विश्वाचे संशोधक पद्मभूषण डॉ. वेरिअर एल्वीन

तरूण युवक वेरिअरचा आनंद गगणात मावेनासा झाला.अत्यंत प्रतिष्ठेचा हा पुरस्कार होता. स्कॉलरशीपसाठी केलेल्या शेक्सपिअरच्या अभ्यासाबरोबर १७ व्या आणि १८ व्या शतकातील काव्याचा अभ्यास मन लावून केले.निकोल स्मिथ हे वेरिअरचे शिक्षक होते.त्यांचे अतिशय निकटचे आणि लाडके विद्यार्थी म्हणजे ऐल्वीन होते. निकोल स्मिथ सरांनी वेरिअरला The oxford Book of 18 th century verse' या ग्रंथाच्या संपादन कार्यात मदत करण्यासाठी सांगितले. ऐल्वीनने तात्काळ हो म्हणाले. यामुळे ऐल्वीनला पुन्हा शिक्षकांच्या आग्रहामुळे सुवर्णसंधीचा पुरेपुर लाभ घेता आला. यामुळे ऐल्वीनच्या बुद्धीला चालना देणारे खाद्य मिळाले. विविध कविच्या काव्याचे वाचनासोबत परिशालन तथा जे कधी न वाचलेल्या काव्याचे वाचन झाले. यास्तव एल्वीनची बुद्धी प्रगल्भ झाली. एल्वीनच्या जीवनाला इंग्रजी साहित्याच्या अभिरूचीने नवे जीवन, नवी दिशा प्राप्त झाली.

आठवड्यातून दोन तास सर स्मिथ यांच्या राहत्या घरी काव्यसौंदर्य यावर चर्चा तथा विविधांगी संवाद होत असे. तसेच सकारात्मक व नकारात्मक विचार यामधील मध्यम मार्ग काढला जाई व जे विचार घातक, हिनकस समाजोपयोगी नाही त्या विचाराला वेगळे काढण्याचे महान कार्य वेरिअरने परिश्रम, अभ्यास, त्याग, संयम बाळगून केले. यातून कमालीची अभिरूची तथा काव्यविषयी सखोल अभ्यासपूर्ण संस्कार झाले असे वेरिअर भाषणातून, चर्चेतून, संवादातून सांगत असे. अठराव्या शतकातील



प्रमुख कवीच्या नामावलीत ब्लेक, कोजरिज, वर्डस्वर्थ, वाईल्ड, बॉस्वेल, पोप, जोन्सन इत्यादी मुख्यतः प्रमुख साहित्यिक कवी होते. यामुळे वेरिअरने इंग्रजी साहित्याच्या अभ्यासाने इंग्रजी साहित्याची पदवी प्रथम श्रेणीत हस्तगत केली हे विशेष.

वेरिअरची आई धार्मिक प्रवृत्तीच्या असल्याने याचा परिणाम व धर्मविषयक विचार बालपणापासून त्यांच्या डोक्यात होता. काव्याचा अभ्यास पूर्ण करून वेरिअरने धर्मशास्त्राकडे आपले मन वेधले. धर्मशास्त्राच्या अभ्यासक्रमात प्रवेश निश्चित झाले. धर्मशास्त्राचा अभ्यास करून चवथ्या वर्षी वार्षिक चर्च काँग्रेसमध्ये 'युवकांच्या चर्चकडून अपेक्षा' या विषयांतर्गत परिसंवादात ऑक्स्फर्ड विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी वेरिअरची निवड झाली. या संधीचा लाभ वेरिअरने घेतला. परिसंवादातील अभ्यासपूर्ण भाषण एवढे गाजले की त्यावेळच्या प्रमुख वृत्तपत्राने ठळक प्रसिद्धी देऊन कळत नकळत वेरिअरला सुवर्णसंधी प्राप्त झाली. धर्मशास्त्रात वेरिअर प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. या पदवीमुळे वेरिअरची नियुक्त बायक्लिफ हॉल महाविद्यालयाचे उपप्राचार्य म्हणून झाली. तो त्यांच्या जीवनसंघर्षातील अत्यंत महत्वाची क्षण होता. उपप्रचार्य झाल्यानंतर निवासाचा प्रश्न सुटला. निवासस्थानच्या मोठमोठ्या खोल्या बघून वेरिअरचे आनंदाश्रू आपोआप बाहेर पडू लागले. घरातील वातावरण आनंदमय झाले. वेरिअर उपप्राचार्य झाल्याने तेवढ्याच जबाबदारीने नियमित व्याख्यान तथा समस्त विद्यार्थ्यांना ज्ञानार्जनाचे, अध्ययन, अध्यापनाचे कार्य केले. एवढेच नव्हे तर विद्यार्थीप्रिय वेरिअर विद्यार्थ्यांच्या ट्युटोरिअलवरती अधिक भर देत असत तथा त्यांचेकडून ते काम ते करून घेत होते. त्यामुळे संस्थेत त्यांची एक नवी ओळख उपप्राचार्यासह अभ्यासू, संशोधक, विद्यार्थ्यांना न्याय देणारे म्हणून महाविद्यालयात प्रसिद्धीस आले. ही ख्याती त्यांची सर्वत्र पसरू लागली. पुढे प्राचार्यांसोबत कमालीचे वैचारिक मतभेद झाल्याने उपप्राचार्य पदाचा त्याग करावा लागला.

**जीवन संघर्षाला मानवतेची हाक :** त्याग, संघर्ष आणि संयम याचा सुरेख संगम म्हणजे बुद्धीमान वेरिअर! उपप्राचार्य पदाचा त्याग केल्यानंतर पुढे काय करावे असा प्रश्न डोक्यात भेडसावत होता. उपरोक्त घटनेमुळे त्यांच्या जीवन संघर्षाला नवे वळण, नवी संधी प्राप्त झाली. आतापर्यंत सरळ, साधे आणि संयमी जीवनाला मर्यादेचे कुंपन होते. शालेय तथा महाविद्यालयीन जीवनात उच्चांक गाठला. शिक्षणात यश संपादन केले होते. उत्तर ऑक्सफर्ड परिसरात स्वतःचे घर तयार केले. तीन महाविद्यालयामध्ये फेलोशिपसाठी सतत बोलणी तथा संवाद सुरू होता. ऑक्सफर्ड विद्यापीठाविषयी मनापासून आवड तथा अभिरूची होती. उपरोक्त विद्यापीठात वेरिअरच्या आवडणाऱ्या सर्व सोयी सवलती उपलब्ध होत्या. उच्चशिक्षणाची कास, अभ्यासूवृत्ती, संशोधनाच्या अनेक मार्ग याचठिकाणी गवसले. तसेच चांगल्या विचारांचे, सकारात्मक बाबीकडे, विज्ञानवादी दृष्टीकोन बाळगणारा, मानवहित जोपासणारा मित्रांचा सहवास सतत मिळत असे. निसर्ग सौंदर्याने परिपूर्ण असा हा विद्यापीठाचा परिसर प्रेरणा तथा आशादायी होता. परंतु यामध्ये त्याचे मन लागेना. काहीतरी कमीपणाची मनस्वी भावना जागृत झाली. मी अपूर्ण आहे असे मनात व डोक्यात विचारांचे द्वंद चालु होते. सत्य काय आहे? वास्तव म्हणजे काय? मन अस्वस्थ का होते याचा विचार एल्विनच्या बुद्धीला फार मोठे आव्हान देणारे ठरले. ●●

**आदिवासी अस्तित्व**



प्रा. डॉ. वामन शेळमाके
मो. 9420973248

“ नेहमी सत्याची साथ द्या,
भलेही तुम्ही एकटे का असेनात... ”



# जगातील तरुण पिढीत लग्नाचे वय वाढत आहे... बदलत्या समाजव्यवस्थेचे वास्तव



आजच्या काळात जगभरातील समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ आणि अर्थतज्ज्ञ यांचे लक्ष वेधून घेणारा एक महत्त्वाचा बदल म्हणजे तरुण-तरुणींच्या विवाहाचे वाढते वय. पूर्वी वीस ते बावीस वर्षांच्या वयात होणारे विवाह आता अनेक देशांमध्ये तीस वर्षांच्या आसपास होत आहेत. भारतातही विशेषतः शहरांमध्ये, उच्चशिक्षित आणि नोकरी करणाऱ्या तरुणांमध्ये ही प्रवृत्ती वेगाने वाढत आहे. हा बदल केवळ वैयक्तिक निवडीचा नसून सामाजिक, आर्थिक, मानसिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचे प्रतिबिंब आहे. काही दशकांपूर्वी विवाह हा आयुष्याचा पहिला मोठा टप्पा मानला जात होता. शिक्षण पूर्ण झाल्यानंतर किंवा अनेकदा शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच विवाह होत असे. मात्र आजच्या पिढीची जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलली आहे. करिअर, आर्थिक स्थैर्य, वैयक्तिक स्वातंत्र्य, आत्मविकास आणि जीवनातील अनुभव यांना प्राधान्य दिले जात असल्याने विवाहाचा निर्णय उशिरा घेतला जात आहे. मानवी गरजांमध्ये झालेला बदल १९५४ मध्ये मानसशास्त्रज्ञ अब्राहम मॅस्लो यांनी मांडलेल्या ‘मानवी गरजांच्या श्रेणीबद्धतेच्या सिद्धांतात’ मानवी गरजांचे पाच स्तर स्पष्ट केले आहेत. सर्वप्रथम अन्न, पाणी, निवारा आणि झोप यांसारख्या मूलभूत गरजा पूर्ण होतात. त्यानंतर सुरक्षितता, आर्थिक स्थैर्य, आरोग्य आणि संरक्षण यांचे महत्त्व वाढते. पुढे प्रेम, आपलेपणा आणि नातेसंबंध, त्यानंतर स्वाभिमान आणि सामाजिक प्रतिष्ठा आणि शेवटी आत्मवास्तविकरण म्हणजे स्वतःच्या क्षमतेचा सर्वोच्च विकास हा टप्पा येतो. पूर्वी भारतातील बहुतांश लोक गरिबीत जीवन जगत होते. कुटुंबाचा उदरनिर्वाह हेच सर्वात मोठे आव्हान होते. त्यामुळे विवाह हा केवळ भावनिक संबंध नसून सामाजिक आणि आर्थिक गरजही होता. कुटुंबाचा विस्तार, घरकामाची जबाबदारी आणि आर्थिक सहकार्य यासाठी विवाह आवश्यक मानला जात असे. आज परिस्थिती बदलली आहे. शिक्षणाच्या संधी वाढल्या, रोजगाराच्या नवीन वाटा खुल्या झाल्या आणि जीवनमान उंचावले. त्यामुळे अनेक तरुणांच्या मूलभूत गरजा पूर्ण झाल्यानंतर त्यांचे लक्ष आत्मविकास, करिअर आणि वैयक्तिक यशाकडे वळले आहे. परिणामी विवाहाचे स्थान आयुष्याच्या सुरुवातीऐवजी पुढील टप्प्यावर गेले आहे. करिअर प्रथम, विवाह नंतर आजचा तरुण बारावी किंवा पदवी पूर्ण झाल्यानंतर लगेच विवाहाचा विचार करत नाही. उच्च शिक्षण, पदव्युत्तर अभ्यासक्रम, व्यावसायिक प्रशिक्षण, परदेशातील शिक्षण, चांगली नोकरी, बढती, स्टार्टअप किंवा स्वतःचा व्यवसाय या गोष्टींना तो अधिक महत्त्व देतो. आजची स्पर्धात्मक अर्थव्यवस्था सतत स्वतःला सिद्ध करण्याची मागणी करते. त्यामुळे अनेक तरुणांना वाटते की आधी स्वतःची ओळख निर्माण करावी, आर्थिक स्थैर्य मिळवावे आणि त्यानंतरच विवाहाचा विचार करावा. त्यामुळे विवाहाचे सरासरी वय आपोआप पुढे सरकत आहे. पर्यायांची वाढ आणि निर्णयाचा गोंधळ आधुनिक तंत्रज्ञानाने माणसाला असंख्य पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. पूर्वी विवाहासाठी काही मोजके प्रस्ताव असत. नातेवाईक, मित्र किंवा परिचित यांच्या माध्यमातून ओळखी होत असत. त्यामुळे निर्णय तुलनेने सोपा होता. आज मात्र विवाह संकेतस्थळे, सोशल मीडिया आणि डेटिंग ॲप्समुळे हजारो संभाव्य जोडीदार काही क्षणांत पाहता येतात. इतके पर्याय उपलब्ध असल्यामुळे ‘याहून चांगला पर्याय मिळेल’ ही भावना सतत मनात राहते. त्यामुळे अंतिम निर्णय घेणे कठीण होते. मानसशास्त्रात याला ‘पॅराडॉक्स ऑफ चॉइस’ असे म्हटले जाते. पर्याय जितके वाढतात तितका निर्णय अधिक गुंतागुंतीचा बनतो. निर्णय घेतल्यानंतरही ‘मी योग्य निर्णय घेतला का?’ हा प्रश्न मनात कायम राहतो. आर्थिक वास्तवाचा वाढता दबाव विवाह उशिरा होण्यामागे आर्थिक कारणेही अत्यंत महत्त्वाची आहेत. आज घरांच्या किंमती, शिक्षणाचा खर्च, आरोग्यसेवा, विमा, वाहन, गुंतवणूक, बचत, निवृत्ती नियोजन आणि वाढती महागाई यामुळे तरुणांवर मोठा आर्थिक ताण आहे. पूर्वी काही वर्षांच्या उत्पन्नात घर घेणे शक्य होत असे. आज अनेक महानगरांमध्ये स्वतःचे घर घेण्यासाठी अनेक दशकांचे उत्पन्न खर्च करावे लागते. त्यामुळे विवाहापूर्वी आर्थिक सुरक्षितता निर्माण करण्याची इच्छा अधिक प्रबळ होत आहे. अनेक तरुणांना असे वाटते की विवाहानंतर जबाबदाऱ्या वाढणार असल्यामुळे आधी मजबूत आर्थिक पाया तयार करणे आवश्यक आहे. त्यामुळे विवाहाचा निर्णय पुढे ढकलला जातो. वैयक्तिक स्वातंत्र्याला वाढते महत्त्व आजची पिढी स्वतःच्या आवडी-निवडी, करिअर, प्रवास, छंद आणि वैयक्तिक विकासाला मोठे महत्त्व देते. अनेकांना जग पाहायचे आहे, विविध संस्कृती अनुभवायच्या आहेत, नवीन कौशल्ये आत्मसात करायची आहेत आणि स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण करायची आहे. त्यामुळे विवाह हा आयुष्याचा शेवटचा उद्देश नसून जीवनातील अनेक महत्त्वाच्या टप्प्यांपैकी एक टप्पा मानला जात आहे. विवाहाविषयीची मानसिक भीतीअनेक तरुणांमध्ये विवाहाबद्दल भीतीही वाढताना दिसते. सतत वाढणारे घटस्फोट, कौटुंबिक हिंसाचाराच्या घटना, नातेसंबंधातील संघर्ष आणि सोशल मीडियावरील नकारात्मक बातम्या यामुळे विवाहाबद्दल असुरक्षितता निर्माण होते. मानसशास्त्रात विवाहाच्या भीतीला गॅमोफोबिया असे संबोधले जाते. अशा व्यक्तींना नातेसंबंध हवे असतात; परंतु दीर्घकालीन बांधिलकीची भीती वाटते. बालपणी पालकांमधील सततचे वाद, हिंसाचार किंवा तुटलेले नातेसंबंध पाहिलेल्या व्यक्तींमध्ये ही भीती अधिक आढळू शकते. सोशल मीडियाचा प्रभाव सोशल मीडियामुळे लोकांना इतरांचे जीवन सतत दिसत राहते. यशस्वी करिअर, महागड्या जीवनशैलीचे प्रदर्शन, तसेच प्रसिद्ध व्यक्तींचे घटस्फोट किंवा कौटुंबिक वाद या दोन्ही गोष्टींचा मानसिक परिणाम तरुणांवर होतो. विवाह म्हणजे मोठा धोका आहे, अशी भावना नकळत निर्माण होऊ शकते. त्यामुळे निर्णय घेण्याची प्रक्रिया अधिक लांबते. स्पष्ट संवादाची गरज यशस्वी वैवाहिक जीवनासाठी परस्पर संवाद अत्यंत आवश्यक आहे. विवाहापूर्वी करिअर, आर्थिक नियोजन, मुलांबाबतची भूमिका, पालकांची जबाबदारी, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि भविष्यातील अपेक्षा याविषयी मोकळेपणाने चर्चा होणे आवश्यक आहे. समजूतदार संवादामुळे अनेक गैरसमज टाळता येतात आणि नातेसंबंध अधिक मजबूत होतात. विवाह म्हणजे बंधन नव्हे, भागीदारी विवाहाकडे केवळ सामाजिक परंपरा किंवा कौटुंबिक दबाव म्हणून पाहण्याची गरज नाही. तो दोन व्यक्तींनी परस्पर विश्वास, आदर आणि समानतेच्या आधारावर स्वीकारलेला सहजीवनाचा निर्णय आहे. योग्य जोडीदार म्हणजे केवळ सुंदर किंवा आर्थिकदृष्ट्या सक्षम व्यक्ती नव्हे; तर आपल्या स्वप्नांना समजून घेणारी, अडचणींमध्ये साथ देणारी आणि परस्पर सन्मान राखणारी व्यक्ती होय. आज जगभरात विवाहाचे वाढते वय हे समाजातील बदलत्या मूल्यांचे द्योतक आहे. शिक्षण, करिअर, आर्थिक वास्तव, वाढलेले पर्याय, मानसिक आरोग्य, वैयक्तिक स्वातंत्र्य आणि सामाजिक बदल या सर्वांचा या प्रक्रियेवर प्रभाव आहे. म्हणूनच विवाह लवकर झाला किंवा उशिरा झाला, हा खरा प्रश्न नाही. महत्त्वाचे म्हणजे तो परिपक्व विचाराने, योग्य संवादाने आणि परस्पर विश्वासाच्या आधारावर व्हावा. समाजाच्या दबावामुळे नव्हे तर स्वतःच्या तयारीनुसार घेतलेला निर्णयच दीर्घकाळ आनंदी वैवाहिक जीवनाचा पाया ठरतो. विवाह हा ओझे नाही, परीक्षा नाही आणि स्वातंत्र्य हिरावून घेणारी व्यवस्था नाही. तो दोन व्यक्तींनी एकमेकांच्या स्वप्नांना साथ देत, समानतेने आणि जबाबदारीने एकत्र प्रवास करण्याचा सुंदर संकल्प आहे. बदलत्या काळात ही जाणीव अधिक महत्त्वाची ठरत आहे.●●



डॉ. सुनिल भगत
मो. 94230 64391

## भंगलेली मूर्ती

अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

त्यांच्या वडिलांची मुलांना कोणतीही गोष्ट समजावून सांगण्याची एक अनोखी पद्धत होती. एकदा त्यांनी आपल्या दोन्ही मुलांना जवळ बोलावले आणि ते आपल्या मोठ्या मुलाला म्हणाले “ मी तुला ही दोन काचेची भांडी देत आहे. ह्यातील एक भांडे आकाराने छोटे तर दुसरे भांडे मोठे आहे. तुला फक्त एवढेच करायचे आहे की, ह्या छोट्या भांड्याच्या आत मोठ्या भांड्याला ठेवायचे आहे “असे म्हणून त्यांनी ती दोन्ही भांडी मोठ्या मुलाच्या हवाली केली. मुलगा विचार करीत होता पण उपाय काही केल्या सापडत नव्हता तेव्हा तो वडिलांना म्हणाला “बाबा ! हे शक्य नाही“ तेव्हा लहान मुलगा म्हणाला “अगदी शक्य आहे. मी करून दाखवतो“ असे म्हणून त्याने मोठे काचेचे भांडे दगडाने फोडले. त्यानंतर त्याने मोठ्या काचेच्या भांड्याचे तुकडे लहान भांड्याच्या आत अगदी सहज टाकले. तेव्हा त्याचे वडिल म्हणाले “बाळांनो ! आम्ही आमच्या आयुष्यात असंच काहीतरी करतो. ज्या व्यक्तींसोबत आपण फिट बसु शकत नाही ह्याची जाणीव असूनसुद्धा आपण आपण आपला मुळ स्वभाव, आपले विचार, आपले तत्व आणि जे जे शक्य असेल ते सर्व तोडून त्यांच्याशी मनाविरूद्ध संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो. पण लक्षात ठेवा की, अशी स्वतःची मोडतोड करून नाते निर्माण करण्या पेक्षा वेगळे राहीलेले बरे. ज्यांच्या सोबत सहजता असेल. तुम्हाला स्वतःत बदल करण्याची गरज नसेल. त्यांच्याशी जरूर नाते जोडा. कारण तुम्ही स्वतःचे आचार, विचार तोडून टाकत असाल तर तुमचे खरे व्यक्तिमत्त्व लोप पावते. जर तुमच्या मुळ अस्तित्वाला तडे जात असतील तर असे नाते जोडून काय उपयोग? अशा व्यक्ती जर तुमच्या पासून दुर जात असतील तर वाजतगाजत धुमधडाक्यात मोठ्या आनंदाने त्यांची रवानगी करावी ह्याऊलट जर चांगल्या समविचारी प्रवृत्तीच्या व्यक्ती जवळ येत असतील तर त्यांचे मनापासून स्वागत करा “हे ऊदाहरण देऊन ते थांबले नाहीत तर त्यांनी रस्त्याच्या कडेला असलेल्या एका झाडाखाली कुणीतरी टाकुन दिलेली देवाची तुटलेली मूर्ती दाखवली आणि म्हणाले “परिस्थिती कशीही असो, स्वतःला कधीही तुटु द्यायचे नसते. एकदा कुणी खचला, तुटला तर ह्या मूर्ती सारखी अवस्था होते. ज्या मूर्तीची कोणे एके काळी ज्यांनी पुजा केली त्याच लोकांनी ह्या भंगलेल्या देवाच्या मूर्तीची अशी विटंबना केली. जर लोकांच्या नजरेत खुद्द परमेश्वराची ही किंमत असेल तेथे माणसांचे काय ? जेव्हा माणूस खचतो तेव्हा त्याला जगाचा हा अनुभव येतो की,‘ सैकड़ों दर्द मंद मिलते है, काम के लोग, चंद मिलते है, जब मुसीबत आती हैं तो , सबके दरवाजे बंद मिलते है “.●●

# उपवर्गीकरण म्हणजे फुटीचे राजकारण डॉ. बाबासाहेबांचा वारसा धोक्यात



अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाचा प्रश्न सध्या देशभर चर्चेत आहे. हा निर्णय वरकरणी मागासलेल्या घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न वाटत असला, तरी त्यामागे अनुसूचित जातींची एकजूट कमकुवत करण्याचा प्रयत्न दडलेला असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. हा विषय केवळ प्रशासकीय नसून सामाजिक, राजकीय आणि घटनात्मकदृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३४१ अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुसूचित जातींना एकसंध घटनात्मक वर्ग म्हणून मान्यता दिली. त्यांच्या दृष्टीने विविध उपजाती असल्या तरी त्या सर्व शतकानुशतके समान प्रकारच्या सामाजिक अन्यायाच्या बळी ठरल्या होत्या. त्यामुळे त्यांची एकजूट टिकून राहणे आणि त्यांची सामूहिक राजकीय शक्ती निर्माण होणे, हा या तरतुदीमागील मूलभूत उद्देश होता. २००४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ई. व्ही. चिन्नय्या विरुद्ध आंध्र प्रदेश राज्य प्रकरणात अनुसूचित जातींचा वर्ग अविभाज्य असल्याचे स्पष्ट केले होते. राज्य सरकारांना उपवर्गीकरण करण्याचा अधिकार नसल्याचेही न्यायालयाने नमूद केले होते. मात्र २०२४ मध्ये स्टेट ऑफ पंजाब विरुद्ध दविंदर सिंह प्रकरणात सात न्यायाधीशांच्या घटनापीठाने हा निर्णय बदलला आणि राज्यांना उपवर्गीकरण करण्याचा मार्ग खुला केला. या निर्णयाशी न्यायमूर्ती बेला त्रिवेदी यांनी असहमती दर्शवत अनुच्छेद ३४१ च्या मूळ उद्देशाचे संरक्षण केले पाहिजे, असे मत नोंदवले. या खटल्यात केंद्र सरकारच्या कायदे अधिकाऱ्यांनीही उपवर्गीकरणाच्या बाजूने भूमिका मांडली. पंजाब राज्य सरकारने हा विषय पुढे आणला आणि केंद्राने त्याला पाठिंबा दिला. त्यामुळे हा केवळ एका राज्याचा प्रश्न नसून व्यापक धोरणात्मक बदल असल्याचे स्पष्ट होते. उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जातींचा एकूण आरक्षण कोटा वाढत नाही. उपलब्ध जागांचे केवळ अंतर्गत पुनर्वाटप होते. त्यामुळे समाजातील विविध घटकांमध्ये स्पर्धा आणि मतभेद वाढण्याची शक्यता निर्माण होते. आरक्षण अपुरे का आहे, रिक्त जागा का भरल्या जात नाहीत, शिक्षण व रोजगाराच्या संधी का वाढवल्या जात नाहीत, या मूलभूत प्रश्नांकडून लक्ष हटते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली अनुसूचित जातींमध्ये निर्माण झालेली सामाजिक आणि राजकीय एकजूट ही भारतीय लोकशाहीतील महत्त्वाची ताकद आहे. ही एकजूट कमकुवत झाली, तर शोषित समाजाची सामूहिक वाटाघाटी करण्याची क्षमता कमी होईल. त्यामुळे उपवर्गीकरण हे सामाजिक न्यायापेक्षा विभाजनाचे साधन ठरू शकते, अशी भीती अनेक अभ्यासक व्यक्त करतात. याच संदर्भात क्रिमीलेयरचा मुद्दाही पुढे येत आहे. अनुसूचित जातींचे आरक्षण हे आर्थिक मागासलेपणावर नव्हे, तर ऐतिहासिक अस्पृश्यता आणि सामाजिक भेदभावावर आधारित आहे. त्यामुळे क्रिमीलेयरची संकल्पना या प्रवर्गाला लागू केल्यास आरक्षणाच्या मूळ तत्त्वज्ञानालाच धक्का बसू शकतो. उपवर्गीकरण आणि क्रिमीलेयर या दोन्ही संकल्पनांचा एकत्रित वापर झाल्यास आरक्षणाचा लाभ अधिक मर्यादित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौद्ध धम्म स्वीकारल्यानंतर लाखो अनुयायांनी स्वाभिमानाचा मार्ग स्वीकारला. धर्मांतरित बौद्ध समाज हा अनुसूचित जातींच्या घटनात्मक चौकटीचाच भाग आहे. भविष्यात उपवर्गीकरण किंवा इतर निकषांच्या आधारे या समाजाला वेगळ्याप्रकारे वागवले गेले, तर ते धम्मक्रांतीच्या मूळ उद्देशालाच बाधा आणणारे ठरू शकते. आजही अनेक सरकारी विभागांमध्ये अनुसूचित जातींसाठी राखीव पदांचा अनुशेष कायम आहे. मोठ्या प्रमाणावर सरकारी क्षेत्राचे खाजगीकरण होत असल्याने आरक्षणाच्या संधी कमी होत आहेत. अशा परिस्थितीत समाजाचे तुकडे करण्यापेक्षा रिक्त पदे भरणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करणे, शिष्यवृत्ती वाढवणे आणि रोजगाराच्या संधी निर्माण करणे या उपायांवर सरकारने भर देणे आवश्यक आहे. उपवर्गीकरणासाठी आवश्यक असलेली परिमाणात्मक आकडेवारी कोणत्या निकषांवर तयार होणार, ती किती निष्पक्ष असेल आणि तिचा वापर राजकीय हेतूंसाठी होणार नाही याचीही खात्री आवश्यक आहे. अन्यथा विविध राज्यांमध्ये वेगवेगळ्या निकषांवर समाजाचे वर्गीकरण होऊन नवीन वाद निर्माण होऊ शकतात. वास्तविक पाहता, समाजातील कोणत्याही घटकाची प्रगती शिक्षण, कौशल्य आणि रोजगाराच्या संधींवर अवलंबून असते. आरक्षण ही संधी उपलब्ध करून देणारी घटनात्मक व्यवस्था आहे; मात्र त्या संधींचा लाभ घेण्यासाठी शिक्षण आणि गुणवत्ता यांनाही तितकेच महत्त्व आहे. त्यामुळे समाजातील मागे राहिलेल्या घटकांना अधिक चांगल्या शैक्षणिक सुविधा, मार्गदर्शन आणि आर्थिक सहाय्य देणे हा अधिक परिणामकारक मार्ग ठरू शकतो. आज आवश्यकता आहे ती विभाजनाची नव्हे, तर एकजुटीची. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला ‘शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा’ हा संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. अनुसूचित जातींतील सर्व घटकांनी परस्परांमध्ये संघर्ष निर्माण करण्याऐवजी समान हक्क, सामाजिक न्याय आणि घटनात्मक मूल्यांच्या संरक्षणासाठी एकत्र राहणे आवश्यक आहे. समाजाची एकजूट टिकली तरच आरक्षणासह सामाजिक न्यायाची संकल्पना अधिक बळकट होईल आणि डॉ. बाबासाहेबांचा समतावादी वारसा पुढील पिढ्यांपर्यंत सक्षमपणे पोहोचेल.●●



ॲड. यशवंत मेश्राम
मो.9823606970

# शैक्षणिक क्षेत्रातील परिवर्तनासाठी देशव्यापी आंदोलने : काळाची गरज

वर्तमान भारतात सद्यःस्थितीत शैक्षणिक क्षेत्रात किती भयावह व दयनिय स्थिती निर्माण झालेली आहे. हे बुद्धीमान व जागरुक नारिकांच्या ध्यानात आलेली आहे व त्या अनुषंगाने देशव्यापी जन आदोलनाच्या तयारिची पार्श्वभुमी होवू घातली आहे. सोनम वांगचुक दुर - दराज क्षेत्रात कार्यकर्ता म्हणून नावारुपास आलेले निसर्गप्रेमी, पर्यावरणवादी तसेच शैक्षणिक क्षेत्रातील भ्रष्टाचाराच्या विरोधात व भ्रष्टाचाराने बरबटलेल्या व्यवस्थेच्या विरोधात आमरण अनसन करीत आहेत. वैद्यकिय क्षेत्रासाठी महत्वाची मानल्या जाणारी राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षेतील कथीत भष्टाचार उधडकीस आलेला आहे. पेपरफुटीमुळे संपुर्ण देशातील वातावरण ढवळून निघाले तसेही आपल्या देशाकरिता ही नवीन बाब नाही. या अगोदरही अशा घटना अधुन मधुन घडत असतात व दिवसेंदिवस हे प्रमाण वाढत आहे आणि त्यामुळे जनमानसांत आक्रोश निर्माण होत आहे. त्यातूनच सोनम वांगचुक सारखे बुद्धीमान व्यक्तीत्व समोर आले असुन आंदोलनाची भुमीका अंगीकारली आहे. पेपरफुटीमुळे लाखो बुद्धीमान, मेहनती व अभ्यासु विद्यार्थ्यांचे नुकसान होवून कैक विद्यार्थ्यांनी नैराश्यामूळे आत्महत्या केल्याचे निदर्शनास येत आहे. दुसरीकडे अभिजित दिपके हा अमेरीकेत वास्तव्यास असलेल्या तरुणाने उपरोक्त बाबीस समर्थन देवून भारतातील जन आंदोलन उभारले व (झुरळ ) कॉकरोज नावाच्या राजकिय पार्टीचे सुद्धा घोषना केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, शिक्षण हे एक शस्त्र आहे. हे शस्त्र योग्य हाती असेल तर त्याचा सदुपयोग होईल. अन्यथा जर का ते अयोग्य, नालायक असलेल्याच्या हाती लागले तर तो त्याचा दुरुप्योग करु शकतो. भारतात शैक्षणिक क्रांतीमुळ दुर्बल घटकातील कैक विद्यार्थी हे जिद्द व चिकाटीने, कष्ट करीत पैसा कमावून शिक्षण घेतलेले असतात. त्यांचा पालकवर्ग कष्टाची कमाई करीत वेळप्रसंगी कर्जबाजारी होवून शिक्षणावर पैसा अडका खर्च करतात. पालक वर्गाच्या सुद्धा अपेक्षा असतात. आपल्या अपत्याकडून स्वतःच्या कतृत्वाने व चांगल्या



गुणांनी उतीर्ण होवून स्वतःच्या पायावर उभे होतील आणि जर का अशा भ्रष्टाचारी, वाम मार्गाचा अवलंब झाल्यास हुषार, जिज्ञासु विद्यार्थी मागे पडतात. त्यांचे जिवन दुर्धर होते व ते नैराश्येच्या गर्तेत जावून ना उमेद होवून आत्महत्येस प्रवृत्त होतात. हे विद्यार्थी आपल्या सार्वभौम भारत देशाचे भावी निर्माते निपजु शकतात. ही बाब प्रस्थापित व्यवस्थेच्या ध्यानी असायला पाहीजे. आंदोलने उभारणे, त्यामध्ये सक्रीय सहभागी होणे न लोकशाही मार्गाने न्याय हक्कासाठी लढा उभारणे लोकशाहीमध्ये जायज असते.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात :-** शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन असायला पाहिजे. लोकशाही जर टिकली पाहीजे असे जर लोकांना वाटत असेल तर जितका सत्ताधारी पक्ष मजबुत, प्रबळ असतो तसाच विरोधी पक्ष सुद्ध असयला पाहिजे. तरच देशात लोकशाही जिवंत राहील. त्या सर्व विपक्षांनी, आपले झंडे, दंडे, उजेंडे बाजूला ठेवून देशव्यापी जन आंदोलन उभारण्याची खरी गरज आहे. सोनम वांगचुक जंतर मंतर येथुन 18/07/26 ला रुग्णालयात दाखल केले. परंतु लगेचच अभिजित दिपके यांनी उपोषण सुरु केले. या उपोषणापासून काय निष्पन्न होते हे काळच ठरवेल. ही आंदोलने जनआंदालनात परिवर्तीत होण्याची खरी गरज आहे. ●●

ऋषिकांत लोखंडे
मो. 9923621071

# प्रतिमा फोडली, पण विचारांचे आकाश मोडू शकले नाहीत!

## राहुल सांकृत्यायन : ज्ञानयात्री, परिवर्तनवादी चिंतक आणि भारतीय प्रबोधनाचा दीपस्तंभ

पश्चिम बंगालमधील राणीगंज येथे प्रख्यात विचारवंत, साहित्यसम्राट आणि इतिहास संशोधक राहुल सांकृत्यायन यांच्या पुतळ्याची तोडफोड झाल्याची घटना केवळ एका पुतळ्यावरचा हल्ला नाही; ती भारतीय प्रबोधन, विवेकवाद, ज्ञानपरंपरा आणि सामाजिक परिवर्तनाच्या विचारविश्वावर झालेली प्रतिकात्मक आघात मानली पाहिजे. विटा-मातीने घडविलेली प्रतिमा मोडता येते, परंतु ज्ञान, समता, विवेक आणि मानवी मुक्तीचा विचार कधीही उद्ध्वस्त करता येत नाही, हे इतिहासाने वेळोवेळी सिद्ध केले आहे. राहुल सांकृत्यायन हे विसाव्या शतकातील भारताचे सर्वात बहुआयामी विद्वान मानले जातात. इतिहासकार, भाषाशास्त्रज्ञ, तत्त्वचिंतक, पुरातत्त्ववेत्ता, कोशकार, साहित्यिक, समाजचिंतक, बौद्ध अभ्यासक, मार्क्सवादी विचारवंत आणि जगप्रवासी घुमक्कड अशी त्यांची ओळख आहे. ज्ञानाच्या शोधासाठी त्यांनी हिमालयाच्या दुर्गम वाटा तुडवल्या, तिबेटच्या बौद्ध विहारांमध्ये दुर्मीळ हस्तलिखितांचा शोध घेतला, श्रीलंका, सोव्हिएत संघ, मध्य आशिया आणि युरोपपर्यंत प्रवास केला. त्यांच्या या ज्ञानयात्रेमुळे भारताला हरवलेल्या बौद्ध परंपरेचा अमूल्य ठेवा पुन्हा प्राप्त झाला. राहुलजींचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी विचारांना कधीही धर्मग्रंथाचे अंतिम सत्य मानले नाही. बुद्धांच्या स्वतः विचार करा या तत्त्वज्ञानाला आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाला त्यांनी आयुष्यभर जपले. म्हणूनच ते बौद्ध संस्कृतीचे अभ्यासक होते, पण अंधश्रद्धेचे अनुयायी नव्हते; मार्क्सवादी होते, पण पंथनिष्ठ नव्हते; भारतीय होते, पण संकुचित राष्ट्रवादाचे समर्थक नव्हते. त्यांच्यासाठी मानवमुक्ती, समता आणि सामाजिक न्याय हीच सर्वोच्च मूल्ये होती. अखेरीस मानवजात समता, परस्पर प्रेम आणि सार्वत्रिक सुख-समृद्धीच्या ध्येयापर्यंत पोहोचेल, हा त्यांचा विश्वास होता. त्यांच्या लेखनातून जातिभेद, धार्मिक कट्टरता, सामाजिक विषमता आणि शोषण यांच्यावर कठोर प्रहार दिसतो. त्यांनी वोल्गा से गंगा, मानवसमाज, दर्शन-दिग्दर्शन, वैज्ञानिक भौतिकवाद, बौद्ध संस्कृती,पाली साहित्याचा इतिहास यांसारख्या





ग्रंथांतून भारतीय समाजाला नवीन वैचारिक दिशा दिली. राहुल सांकृत्यायन यांनी भारतीय भाषांना, विशेषतः हिंदी, पाली, संस्कृत, अपभ्रंश आणि तिबेटी साहित्याला दिलेले योगदान अमूल्य आहे. त्यांनी हरवलेल्या ज्ञानपरंपरांचे पुनरुज्जीवन केले. भारतीय विद्यापीठांनी ज्यांना पुरेसे स्थान दिले नाही, त्या विद्वानाला श्रीलंका आणि सोव्हिएत संघातील विद्यापीठांनी प्राध्यापक म्हणून सन्मानाने आमंत्रित केले, ही बाब त्यांच्या जागतिक विद्वत्तेची साक्ष देते. आज त्यांच्या पुतळ्याची तोडफोड करणाऱ्यांनी कदाचित दगड फोडले असतील; परंतु त्यांनी ज्यासाठी आयुष्य अर्पण केले - ज्ञान, विवेक, समता आणि मानवी बंधुता - त्या मूल्यांना धक्का देणे अशक्य आहे. उलट अशा घटना राहुल सांकृत्यायन यांच्या कार्याची आणि विचारांची नव्याने आठवण करून देतात. आजच्या ध्रुवीकरणाच्या, द्वेषाच्या आणि बौद्धिक संकुचिततेच्या काळात राहुल सांकृत्यायन यांचे विचार अधिकच प्रासंगिक ठरतात. समाजाला पुढे नेणारी शक्ती तलवारीत नसते, ती पुस्तकात असते; पुतळ्यात नसते, ती विचारात असते; घोषणांत नसते, ती विवेकात असते. त्यामुळे राहुल सांकृत्यायन यांना खरी श्रद्धांजली त्यांच्या प्रतिमांचे संरक्षण करून नव्हे, तर त्यांच्या ज्ञान, समता आणि मानवमुक्तीच्या विचारांचा प्रसार करूनच वाहता येईल. भारतीय प्रबोधनाच्या इतिहासात राहुल सांकृत्यायन हे केवळ एक नाव नाही, तर अखंड ज्ञानसाधना, सामाजिक परिवर्तन आणि विवेकनिष्ठ संघर्षाचे तेजस्वी पर्व आहेत. त्यांच्या विचारांचे प्रकाशपर्व कोणत्याही विध्वंसक प्रवृत्तीपेक्षा अधिक दीर्घायुषी आहे आणि राहील.●●

प्रमोद जांभूळकर
मो.9823969097

दिल्लीत कॉक्रोच जनता पार्टीचे NEET पेपर फुटीच्या निमित्ताने अभूतपूर्व असे आंदोलन झाले. वास्तविक कॉक्रोच जनता पार्टी हे निमित्त असले तरी, हे आंदोलन तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळालेले आंदोलन होते, सरकारने हे आंदोलन चिरडन्याचे सर्व प्रयत्न केले मात्र आज अक्षरशः सरकारची भीती अर्थात सरकारचा डरपोकपणा दिल्लीच्या रस्त्यावर बघायला मिळाला. सरकारने सुरुवातीला हे आंदोलन आपल्या पाळीव ट्रोलर गैंगच्या मदतीने बदनाम करण्याचे प्रयत्न केले, बीजेपीची बी टीम म्हणून अप्रत्यक्ष प्रचार केला, सोनम वांगचुक यांनी आंदोलनात उडी घेतल्यावर सरकारच्या लोकांनी त्यांना देखिल बदनाम करण्याचा प्रयत्न केला, त्यांना देशद्रोही, चीनचा हस्तक, तो वैज्ञानिक नाही असा धुवांधार प्रचार समाज माध्यमावर केला गेला. मात्र सोनम वांगचुक यांना वाढता पाठिंबा बघितल्यावर, आंदोलन चिरडण्याची पहिली खेळी सरकारने लोकसभा आंदोलनाच्या तीन दिवस आधी सोनम वांगचुक यांना अतिशय अपमानास्पद पद्धतीने अक्षरशः गठडी करून जंतर मंतर येथून उचलून दवाखान्यात दाखल केले. सरकारला असे वाटले की, आता आंदोलन संपेल किंवा विस्कळीत होईल किंवा त्याला मिळणारा प्रतिसाद संपून जाईल. मात्र अभिजित दीपके आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी लगेचच स्वतःला सावरले आणि अभिजित दीपके यांनी स्वतः अन्न त्याग आंदोलन सुरू केले, त्यांनी देशातील तरुणांना २० जुलैच्या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. सोनम वांगचुक यांना उचलल्यावरच सरकार हे आंदोलन आंदोलनकांच्या सोबत कुठलीही बातचीत न करता चिरडून टाकण्याच्या तयारीत आहे हे स्पष्ट जाणवू लागले होते. १९ तारखेला हळू हळू वाढत जाणारे पोलिस बळ, रैपिड एक्शन फोर्स, वरुण, वज्र सारख्या यंत्रणा आणि प्रत्येक १०० मीटर वर लावलेले बॅरीगेट्स हे स्पष्ट दिसत होते. असे असले तरी सरकार तरुणांना दिल्लीत येण्यापासून रोखू शकली नाही. सुमारे दोन लाख तरुण देशाच्या सर्वच भागातून दिल्लीत पोहचले, आणखी तरुण दिल्लीत पोहोचू नये म्हणून सरकारने रडीचा डाव खेळला, दिल्लीकडे येणाऱ्या ट्रेन ५/६ तास लेट केल्या, दिल्लीतील पांच मेट्रो स्टेशन बंद करून टाकले, इतकेच काय कुठल्याही वृत्त वाहिन्यांवर थेट प्रक्षेपण होऊ नये यासाठी या परिसरातील इंटरनेट सेवा बंद करून टाकली. सरकारचे सर्व अडथळे विद्यार्थ्यांनी पत्त्यासारखे उडवून लावले, मात्र सरकारने बोलण्याची तयारी दाखविली, तेंव्हा सोनम वांगचुक यांनी आणि दिपके यांनी संसदेकडे मोर्चा नेण्याचे स्थगित करण्याचा निर्णय जाहीर केला. त्यामुळे आंदोलक शांत झाले. नाहीतर आंदोलक अश्रू धूर, लाठी चार्ज यांना काही जुमानत नव्हते. जर सोनम वांगचुक व दिपके

### दिल्लीतील मोर्चाने दाखवले देशातील जनमत बदलत आहे.

# देशातील पापी लोकांना पाप धुण्याची संधी



यांनी मोर्चा रद्द केला नसता तर दोन लाख आंदोलकांच्या पुढे ५/१० हजार पोलिसांचा काय टिकाव लागला असता? कधी नव्हे ते सरकार घाबरल्याचे दिसले आणि स्वतःच्या अहंकारी आणि उर्मट पणासाठी गेल्या १२ वर्षात प्रसिद्ध असणाऱ्या सरकारला नाक मुठीत धरून आणि लोकसभेचे पावसाळी सत्र सुरळीत पार पाडायचे असल्याने चर्चेचे गाजर आंदोलकांना दाखवावे लागले आहे. मात्र सरकारला विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवन्यात रस असल्याचे दिसत नाही, तसे असते तर हवे तेंव्हा आणि हवे तसे मुख्यमंत्री बदलण्याचा ज्या सरकारचा इतिहास आहे, त्यांना एक शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांना हटवणे किंवा त्याचे खाते बदलणे अतिशय क्षुल्लक बाब होती. मात्र आम्ही तुम्हाला मोजत नाही, तुम्ही माझे घंटा काही वाकडे करू शकत नाही. तुम्ही तसा प्रयत्न केला तर माझ्याकडे तुम्हाला देशद्रोही, अर्बन नक्सल, तुमच्या घरावर बुलडोझर असे एक नाही हजारो शस्त्र आपल्या पायाशी असल्याचा उर्मटपणा सरकारकडे आहे आणि हा ऊर्मटपणा यापूर्वी अनेक वेळा उघड झाला आहे. मात्र आजच्या आंदोलनाने देशातील जनमत बदलत आहे याची चुणूक दाखवली आहे. आज सरकारने तरुणांच्या आंदोलनातील मागण्यांवर विचार करण्यासाठी वेळ मागून घेतला आहे. मात्र सरकारची ही बफर एक्शन असल्याचा दाट संशय आहे. सरकारने वेळ मागून आंदोलनाची पकड ढिली करण्याचा डाव आहे का? कारण जर मागण्यांवर विचार करण्यासाठी वेळ हवा होता तर हे काम सरकार ५/७ दिवस आधी सहज करू शकली असते. त्यामुळे कदाचित मोर्चा निघाला देखील नसता. मात्र सरकारने आंदोलनाला हलक्यात घेतले आणि अजून देखील सरकार फार गंभीर आहे असे दिसत नाही. कारण पावसाळी अधिवेशनाच्या भाषणात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर ब्र शब्द काढला नाही. यातच सरकारची नियत समोर येते. इतकेच नाही तर विरोधी पक्षांनी विद्यार्थी आंदोलनावर लोकसभेत चर्चा करण्याची मागणी केली असता सरकारने लोकसभेचे पहिल्या दिवसाचे कामकाज तहकूब करून चर्चेला ठेंगा दाखवला. २० जुलै च्या मोर्चाने प्रश्न तडीस न लागल्याने सोनम वांगचुक आणि अभिजित दिपके यांनी आंदोलन तसेच पुढे सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. यानिमित्ताने देशाच्या विविध राज्यात दिल्लीतील आंदोलनाला पाठिंबा देणारी अनेक आंदोलने ठिकठिकाणी झाले. मात्र हे आंदोलन अजून तीव्र करण्याची गरज आहे. त्यासाठी देशातील कोट्यवधी लोकांनी आपापल्या स्तरावर या मुद्द्यावर आपापल्या राज्यात, जिल्ह्यात आणि तालुक्यात आंदोलने केली पाहिजे. प्राध्यापक, शिक्षक आणि कामगारांनी या आंदोलनाला आपल्या कामाच्या ठिकाणी काळी फित लाऊन पाठिंबा दिला पाहिजे, देशातील शेतकरी, रिक्षा, टॅक्सी आणि ट्रक वाहतूक करणाऱ्या प्रत्येकाने आपल्या riksha ला काळा कापड लाऊन निषेध आणि पाठिंबा जाहीर केला पाहिजे. सध्या देशात सुरू असलेल्या मनमानी कारभाराची कोंडी फोडण्याची हे आंदोलन निमित्त होऊ शकते आणि बेलगाम सरकारला लगाम देखील लावता येऊ शकतो. कारण सध्या देशात भारत सरकार आहे की, भारतीय जनता पक्षाचे सरकार असा प्रश्न पडावा अशी स्थिती आहे. एका पक्षाचे मनमानी, हेकेखोर सरकार देशाच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक आरोग्यासाठी प्रचंड घातक आहे. त्यामुळे निवडणुकीत खूप पैसे खाल्ले असतील, फुकटच्या पैशावर देवदर्शन केले असेल, दारूच्या पार्ट्या झोडपल्या असतील, फुकट पिकनिकला गेला असाल, स्वतःच्या कॉलनीत लाद्या टाकून घेतल्या, इमारतीला रंग लाऊन घेतला, फुकट पाईप लाइन टाकून घेतली किंवा मता मागे ५ ते १० हजार रुपये घेऊन मतदान केले असेल तर ते केलेले पाप धुण्याची संधी चालून आली आहे, आंदोलनाच्या प्रवाहात डुबकी मारून स्वच्छ होण्याची संधी आली आहे. त्याचा फायदा घ्या.●●

किरण सोनावणे
मो.9922666607

बहुजन सौरभ

BAHUJAN SAURABHA



# जानेवारी २०२६ पासून २ टक्के वाढीव महागाई भत्ता मंजूर करण्याची मागणी



**नागपूर :** केंद्र सरकारने २२ एप्रिल २०२६ रोजी केंद्रीय पेन्शनधारकांना १ जानेवारी २०२६ पासून २ टक्के वाढीव महागाई भत्ता मंजूर केला आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र शासनानेही राज्यातील कार्यरत कर्मचारी व पेन्शनधारकांना वाढीव महागाई भत्ता फरकासह तात्काळ मंजूर करावा, अशी मागणी राज्य सरकारी पेन्शनर्स संघटना, महाराष्ट्रने केली आहे. यासंदर्भात संघटनेचे सरचिटणीस चंद्रहास सुटे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर केले आहे. निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्र शासनाने केंद्र सरकारच्या निर्णयानुसार महागाई भत्ता देण्याचे धोरण स्वीकारलेले आहे. त्यामुळे केंद्राप्रमाणेच राज्यातील पेन्शनधारकांनाही १ जानेवारी २०२६ पासून २ टक्के वाढीव महागाई भत्ता मंजूर करण्यात यावा. संघटनेने निवेदनात नमूद केले आहे की, वाढत्या महागाईमुळे पेन्शनधारकांवर आर्थिक ताण वाढला आहे. मुलांचे शिक्षण, वैद्यकीय उपचार, तसेच बेरोजगार मुलांच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी अनेक पेन्शनधारकांवर असल्याने सध्याची पेन्शन अपुरी पडत आहे. त्यामुळे १ जानेवारी २०२६ पासून वाढीव महागाई भत्ता फरकासह तातडीने लागू करून पेन्शनधारकांना दिलासा द्यावा, अशी मागणी राज्य सरकारी पेन्शनर्स संघटना, महाराष्ट्रने केली आहे.

# वट थाई इंडियन बुद्धिस्ट मॉनेस्ट्रीमध्ये भदंत डॉ. संघसेन शास्त्री आचार्य यांची ६८ वी जयंती साजरी



**नागपूर :** प्रतापनगर येथील मंजुळाबाई रहाटे ले-आऊट, मेन रोडवरील वट थाई इंडियन बुद्धिस्ट मॉनेस्ट्रीचे संस्थापक सचिव, परिनिर्वाणस्थ भदंत डॉ. संघसेन शास्त्री आचार्य यांच्या ६८ व्या जयंतीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

जयंतीनिमित्त भिक्खू-भिक्खुणी संघाच्या वतीने परित्त सुत्त पठण (संज्झायन) व धम्मदेशनाचे आयोजन करण्यात आले. तसेच उपासक-उपासिकांनी आपल्या घरून आणलेल्या भोजनाचे संघदान केले. त्यानंतर सर्वांनी सहभोजनाचा लाभ घेतला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ऑल इंडिया भिक्खू संघ, विदर्भ प्रदेशचे अध्यक्ष पूज्य भदंत प्रियदर्शी महास्थविर होते.

यावेळी वट थाई इंडियन बुद्धिस्ट मॉनेस्ट्रीचे अध्यक्ष भदंत नागदीपंकर महास्थविर यांनी आपल्या मनोगतात भदंत डॉ. संघसेन शास्त्री आचार्य यांच्या धम्मप्रचार, प्रसार आणि समाजकार्याचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी सांगितले की, भदंत संघसेन शास्त्री यांनी परिनिर्वाणस्थ भदंत लार्ड अबॉट धम्मविरानुवंत महास्थविर, डॉ. ॲड. प्रा. सिवलीबोधी महास्थविर, भदंत सदानंद महास्थविर, भदंत सतधम्मादित्य महास्थविर, भदंत धीरधम्म महास्थविर, भदंत प्रज्ञापाल महास्थविर, भदंत बोधिविनीत महास्थविर आणि भदंत एन. सुगतबोधी महास्थविर यांच्या मार्गदर्शनाखाली धम्मप्रचाराचे कार्य केले. तसेच वैद्यकीय उच्च शिक्षण आणि नागपूर विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या थायलंडच्या विद्यार्थ्यांना दिलेले सहकार्य, तसेच वट थाई इंडियन बुद्धिस्ट मॉनेस्ट्रीच्या स्थापनेपासूनच्या संघर्षमय प्रवासाचा त्यांनी उजाळा दिला.

या कार्यक्रमास भदंत विपस्सी स्थविर, भदंत वन्नासारा स्थविर, भदंत वारासमी स्थविर, भिक्खू वप्प, भिक्खुणी सूर्या, भिक्खुणी धम्मदिन्ना, भिक्खुणी संघमित्रा, भिक्खुणी आम्रपाली यांच्यासह अनेक भिक्खू-भिक्खुणी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी वट थाई इंडियन बुद्धिस्ट मॉनेस्ट्रीचे दायक-दायिका, उपासक-उपासिका यांनी परिश्रम घेतले. मोठ्या संख्येने उपस्थित धम्मबंधू-भगिनींनी कार्यक्रमात सहभागी होत भदंत डॉ. संघसेन शास्त्री आचार्य यांच्या कार्याला अभिवादन केले.

# वैदर्भीय आंबेडकरी साहित्य संमेलनात नागपूरच्या कवींच्या कवितांनी रंगविले कविसंमेलन



**अमरावती :** अखिल भारतीय आंबेडकरी साहित्य व सांस्कृती संवर्धन महामंडळाच्या वतीने अमरावती येथे दि. १८ व १९ जुलै रोजी दोन दिवसीय चौथे वैदर्भीय आंबेडकरी साहित्य संमेलन पार पडले. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध कवी व समीक्षक युवराज गंगाराम होते. संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी, कवी संमेलनात नागपूरच्या कवींनी आपल्या प्रभावी आणि विचारप्रवर्तक कवितांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. शालिक जिल्हेकर, हृदय चक्रधर, संदीप गायकवाड, नागेश वाहुरवाघ आणि लिलाधर गायकवाड यांनी आंबेडकरी विचार, सामाजिक परिवर्तन, समता आणि मानवी मूल्यांवर आधारित दमदार कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

या सर्व कवींच्या प्रभावी सादरीकरणाला श्रोत्यांनी टाळ्यांचा कडकडाट करत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कवितांमधून सामाजिक जाणिवा, परिवर्तनाची प्रेरणा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभावी आविष्कार घडल्याने कवी संमेलनाला विशेष रंगत प्राप्त झाली. दोन दिवसीय या साहित्य संमेलनात विदर्भातील विविध भागांतील साहित्यिक, कवी, अभ्यासक आणि आंबेडकरी चळवळीशी निगडित कार्यकर्त्यांचा मोठ्या संख्येने सहभाग होता. साहित्य, संस्कृती आणि परिवर्तनवादी विचारांचा जागर घडविणारे हे संमेलन उत्साहपूर्ण वातावरणात झाले.

## महत्वाचे

### एसआयआर प्रक्रियेमागे भाजपचे षडयंत्र असल्याचा बसपाचा आरोप

**नागपूर :** विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (SIR) प्रक्रियेच्या माध्यमातून बहुजन समाजातील मतदारांना मतदार यादीतून वगळण्याचे षडयंत्र भाजपने रचल्याचा आरोप बहुजन समाज पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे यांनी केला आहे. शेवडे यांनी प्रसिद्धीपत्रकात दावा केला की, भंडारा, गोंदिया व गडचिरोली येथून युवकांना नागपुरात आणून बूथस्तरावर कामाला लावण्यात आले असून त्यांचा वापर मतदार यादीत हस्तक्षेप करण्यासाठी केला जात आहे. त्यांनी SIR प्रक्रियेऐवजी जनगणनेप्रमाणे घराघरांत जाऊन नव्याने मतदार नोंदणी करण्याची मागणी केली. निवडणूक आयोगाकडे स्वतंत्र यंत्रणा नसल्याने बीएलए व्यवस्थेचा गैरफायदा घेतला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. या प्रकरणाची दखल घेऊन निवडणूक आयोग आणि शासनाने आवश्यक कारवाई करावी, अशी मागणी उत्तम शेवडे यांनी केली.

# त्रिमूर्तीनगर विपश्यना केंद्रात एकदिवसीय विपश्यना शिबिर



**नागपूर :** त्रिमूर्ती नगर येथील विपश्यना केंद्रात एकदिवसीय विपश्यना शिबिर शांततामय आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. गेल्या तीन-चार वर्षांपासून या केंद्रात नियमितपणे सकाळी व संध्याकाळी विपश्यना साधना केली जाते. त्याच परंपरेचा भाग म्हणून साधकांनी एकत्र येऊन या शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात ५१ साधकांनी सहभाग नोंदवून विपश्यना साधनेचा लाभ घेतला. निसर्गरम्य आणि शांत वातावरणात पार पडलेल्या शिबिरामुळे सहभागी साधकांना ध्यानाचा समृद्ध अनुभव मिळाला. शिबिरानंतर साधकांनी समाधान व्यक्त करत शिबिर अत्यंत उत्तम झाल्याची प्रतिक्रिया दिली. तसेच, अशा प्रकारचे एकदिवसीय विपश्यना शिबिर दर महिन्याला आयोजित करण्यात यावे, अशी सूचनाही सहभागी साधकांनी केली. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी योगदान देणाऱ्या सर्व साधकांचे सचिव डी.एस. वाहाणे यांनी आभार मानत त्यांचे अभिनंदन व साधुवाद व्यक्त केले.



# उपजीविका तर्फे नक्षलग्रस्त भागातील १५० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

**नागपूर :** उपजीविका सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने नक्षलग्रस्त अतिदुर्गम भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने शालेय साहित्य वाटपाचा उपक्रम उत्साहात पार पडला. रविवार (दि. १९ जुलै) रोजी एओपी पोलीस कॅम्प, गोठणगाव (पोलीस स्टेशन किशोरी हद्द) येथे आयोजित कार्यक्रमात जिल्हा परिषद शाळा केळवद आणि जिल्हा परिषद शाळा गोठणगाव येथील सुमारे १५० गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांना शालेय बॅग, वह्या, कंपास बॉक्स तसेच अन्य आवश्यक शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला पोलीस निरीक्षक शुभम नवले (पोलीस स्टेशन किशोरी), पोलीस निरीक्षक अरविंद जाधव (सीआरपीएफ एओपी गोठणगाव), डॉ. अनिल बुटले (लायन्स क्लब), समाजसेवक सुहास खरे, मुख्याध्यापक ठाकरे सर, नारायण बुद्धवंत तसेच सतीश भोवते (मेजर, पोलीस स्टेशन गोठणगाव) यांची प्रमुख उपस्थिती होती.

या उपक्रमाचे नियोजन एओपी कॅम्प गोठणगावचे पोलीस निरीक्षक निलकंठ गीते यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष धिरज गलगले, कार्याध्यक्ष विलास कडू, अनिल जवाडे, मनीष पाठराबे, उपाध्यक्ष जयंत तुरणकार, सचिव संजय मार्कंडे, कोषाध्यक्ष मनीषा गलगले, स्वप्नील बाराहाते, प्रमोद पारधी, करुणा गलगले, साहेबराव पांडव तसेच संस्थेचे सदस्य, पोलीस स्वयंसेवक आणि स्थानिक प्रतिनिधींनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे योगदान दिले.

यावेळी शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, पालक आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# SIR प्रक्रियेसाठी दोन महिन्यांच्या मुदतवाढीची मागणी



**नागपूर :** फेडरेशन ऑफ महाराष्ट्र मुस्लिम्स, नागपूरतर्फे महाराष्ट्रातील विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (SIR) प्रक्रियेसाठी किमान दोन महिन्यांची मुदतवाढ देण्याची मागणी निवासी उपजिल्हाधिकारी अनूप खांडे यांच्यामार्फत मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र आणि भारत निवडणूक आयोगाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली.

निवेदनात खरीप हंगाम, आषाढी वारी, अपूर्ण प्रि-SIR मॅपिंग, BLO वरील वाढता कामाचा ताण आणि तांत्रिक अडचणींमुळे अनेक पात्र मतदार वंचित राहण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. तसेच व्यापक जनजागृती, स्थानिक भाषांमध्ये माहिती, BLOंना अतिरिक्त मनुष्यबळ, घरपोच फॉर्म वाटप आणि ऑनलाइन प्रणालीतील त्रुटी दूर करण्याची मागणी करण्यात आली.

निवेदन देताना मोहम्मद अरशद, खलिकुझ्जमा, आरिफ बेलीम, मोहम्मद उमर, बेनझीर खान, कुर्रतुल ऐन बुशरा, मृणालिनी दहीवडे, ॲड. सुषमा भड, डॉ. माधव जांभुळे आणि डॉ. विणा नगरारे उपस्थित होते.

### लोकसेवा विद्यालयात विद्यार्थी निवडणूक



**हिंगणा :** लोकसेवा विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय खैरी पन्नासे येथे वर्गनायक(कॅप्टन) व शाळा नायक(स्कूलकॅप्टन) निवडण्यासाठी मुख्याध्यापक सुनिल अभिमान झाडे यांच्या अध्यक्षतेखाली सार्वत्रिक निवडणूक घेण्यात आली. सदर निवडणूक ही लोकशाही पद्धतीने घेऊन प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया काय व कशी होते? हे विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष मतदान करून जाणून घेतले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनीच स्वतः मतदान अधिकारी व केंद्राध्यक्ष बनून मतदान प्रक्रिया पार पाडली. सदर कार्यक्रमासाठी गावचे सरपंच चंद्रशेखर पिसे तसेच शाळा समिती अध्यक्ष रविंद्र वानखेडे उपस्थित होते. निवडणूक प्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडण्यासाठी शाळेतील शिक्षक गजानन जवंजाळ, अमित गायधने, रमेश ठवकर,प्रजित हाडके, गजानन डाखले, महेंद्र देवते, पौर्णिमा वानखडे, संध्या मते यांनी व शिक्षकेत्तर कर्मचारी स्वप्नील तभाने, संजय तामगाडगे, प्रतिभा तागडे यांनी परिश्रम घेतले.

# आसमान फाउंडेशन तर्फे भोरगड आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**नागपूर :** आसमान फाउंडेशन, नागपूरच्या वतीने काटोल तालुक्यातील भोरगड येथील इंग्रजी माध्यम शासकीय आदिवासी आश्रम शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना नव्या शैक्षणिक सत्रानिमित्त शालेय साहित्य, ड्रॉइंग बुक व कलर बॉक्सचे वाटप करण्यात आले. यासोबतच आश्रम शाळेच्या परिसरात विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला. यावेळी आसमान फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. रवी गिऱ्हे यांनी भोरगडसारख्या दुर्गम भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कार्यरत असलेल्या आश्रमशाळा प्रशासनाचे कौतुक करत त्यांचे आभार मानले. फाउंडेशन तर्फे दरवर्षी प्रमाणे या भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याच्या माध्यमातून सहकार्य करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाला आसमान फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. रवी गिऱ्हे, सचिव नरेश शेंडे, संचालक दिनेश टेकाडे, आसमान महिला क्रेडिट सोसायटीच्या अध्यक्षा व फाउंडेशनच्या संचालिका मेघा गिऱ्हे, आश्रमशाळेचे अधिक्षक सुदर्शन पोटोडे, शिक्षकवृंद तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांनुसार आचरण करणे हीच खरी जयंती : अनिल महानाम



**नागपूर :** भारतीय बौद्ध धम्म मित्र ग्रुप (नवी विचारधारा) यांच्या 'धम्म आपल्या घरी' या उपक्रमांतर्गत आयोजित कार्यक्रमात राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख वक्ते प्रचारक अनिल महानाम यांनी शाहू महाराजांच्या कार्याचा सखोल आढावा घेत त्यांच्या विचारांचे आजच्या काळातील महत्त्व अधोरेखित केले. अनिल महानाम म्हणाले, 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारांनुसार आणि कार्यानुसार वाटचाल करणे म्हणजेच त्यांची जयंती शंभर टक्के साजरी करणे होय. केवळ फोटो लावून किंवा पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी होत नाही.' डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही शाहू महाराजांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्याचे महत्त्व अधोरेखित केले होते, असे त्यांनी सांगितले. यावेळी त्यांनी शाहू महाराजांच्या जीवनप्रवासाचा आढावा घेत त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक सुधारणांची माहिती दिली. कोल्हापूर संस्थानात मागासवर्गीयांना शासकीय नोकऱ्यांमध्ये ५० टक्के आरक्षण, मोफत शिक्षण, वेठबिगारी प्रथेची समाप्ती, महिलांना वारसाहक्क, बालविवाहबंदी, आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन, देवदासी प्रथा निर्मूलन तसेच अस्पृश्य समाजाच्या उन्नतीसाठी केलेले कार्य हे भारतीय समाजसुधारणेतील मैलाचे दगड असल्याचे त्यांनी नमूद केले.गाराम कांबळे यांच्या सत्यसुधारक हॉटेल स्थापनेसाठी शाहू महाराजांनी आर्थिक मदत व जागा उपलब्ध करून दिली. जातीभेद निर्मूलन आणि सामाजिक समतेसाठी त्यांनी केलेले कार्य आजही प्रेरणादायी असल्याचे महानाम यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शैलजा गेडाम यांनी केले. भंते जी सारी पुत्त थेरो यांनी संचालन केले, तर जयमाला रामटेके यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाचा समारोप केला. कार्यक्रमास वैशालीनगर येथील संजय चहांदे, बेजनबाग युनिट-१ मधील शशांक चव्हाण, संजय इंगोले, राजू गेडाम, मधुकर नंदेश्वर, तसेच पंचशील नगर युनिटमधील ज्योत्स्ना गायकवाड, विशाखा वानखेडे, देवी उके, अनुसया मंडपे यांच्यासह अनेक धम्मबंधू-भगिनी उपस्थित होते.



# रँकर्स हबतर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**नागपूर :** बेसा येथील रँकर्स हबतर्फे श्री भवानी सभागृहात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व करिअर मार्गदर्शन सोहळा उत्साहात पार पडला. इयत्ता ८ वी, ९ वी, १० वी, १२ वी तसेच अबॅकस विभागातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान केला. कार्यक्रमाचे उद्घाटन महापौर नीता ठाकरे व परिवहन सभापती मंगला खेकरे यांच्या हस्ते झाले. मार्गदर्शनपर सत्रात डॉ. नानोटी यांनी कौशल्याधारित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले, तर वैज्ञानिक अजिंक्य कोत्तावार यांनी विद्यार्थ्यांना विविध करिअर पर्याय आणि 'प्लॅन ए, बी, सी' तयार ठेवण्याचा सल्ला दिला. यावेळी महापौर नीता ठाकरे यांनी सकारात्मक विचार, सातत्यपूर्ण परिश्रम आणि आत्मविश्वासाच्या जोरावर यश संपादन करता येते, असे सांगितले. कार्यक्रमाला विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

### किरण मिडब्रेन अकादमीतर्फे २९ इंडिया वर्ल्ड रेकॉर्डधारक विद्यार्थ्यांचा सत्कार




**नागपूर :** किरण मिडब्रेन अकादमीतर्फे ब्लाइंडफोल्ड कौशल्यांमध्ये इंडिया वर्ल्ड रेकॉर्ड प्रस्थापित करणाऱ्या २९ विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार करण्यात आला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे व सन्मानचिन्हे प्रदान करण्यात आली. अकादमीचे संस्थापक डॉ. किरण काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली ध्यान, योग, एकाग्रता आणि व्यक्तिमत्त्व विकासावर आधारित प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्मरणशक्ती, निरीक्षणशक्ती, आत्मविश्वास आणि एकाग्रता विकसित होत असल्याचे मान्यवरांनी सांगितले. कार्यक्रमाला श्रीमंत मुधोजी महाराज भोसले, मुस्ताक पठाण, डॉ. सुलक्षणा भुयार आदी मान्यवर उपस्थित होते.

# बुद्ध विहार समन्वय समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा

## बुद्ध विहार समन्वय समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा




**नागपूर :** बुद्ध विहार समन्वय समितीची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी अशोक सरस्वती होते, तर अ.का. पाटील यांनी संचालन करून प्रास्ताविक व वार्षिक अहवा सादर केला. व्यासपीठावर राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रा. घनश्याम धाबर्डे व केंद्रीय महासचिव उपस्थित होते.

सभेची सुरुवात सामुदायिक बुद्धवंदनेने झाली. यावेळी वार्षिक लेखाजोखा, पाली भाषा परीक्षा, सम्यक मॅरेज ब्युरो, लेणी संवर्धन, जपानी भाषा प्रशिक्षण, राष्ट्रीय कार्यकर्ता प्रशिक्षण आणि राष्ट्रीय अधिवेशन या विषयांवर सविस्तर चर्चा केली

उत्तमकुमार मेश्राम, प्रा. आनंद वासनिक आणि धेन्नुत्तम बाम्बोर्डे यांनी आपल्या विभागांचे अहवाल सादर केले. ॲड. शेंडे व वाघमारे यांनी चर्चेत सक्रिय सहभाग घेतला, तर लोखंडे व वरिष्ठ कार्यकर्त्यांनी मार्गदर्शन केले. अभियंता शुद्धोधन बडवने आणि एस.एस. राऊत यांनीही मनोगत व्यक्त केले.

सभेच्या यशस्वी आयोजनासाठी अशोक पाटील, बाबा गायकवाड आणि दिलीप बागडे यांनी विशेष परिश्रम घेतले. बुद्ध विहार समन्वय समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# २६ जुलै रोजी राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा

**हिंगणघाट :** सहयोग कल्याणकारी बहुउद्देशीय संस्था, नागपूरद्वारे संचालित बुद्धिस्ट मंगल परिणय ग्रुपच्या वतीने रविवार, २६ जुलै रोजी दुपारी १२ ते ४ या वेळेत रिठे भवन, न्यू यशवंत नगर, मास्टर कॉलनी, हिंगणघाट येथे राज्यस्तरीय भव्य वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. विवाहयोग्य युवक-युवतींना योग्य जीवनसाथी शोधण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाला नगरसेवक विक्रांत भगत, ईश्वरदास कुंभारे, प्रशांत मून, पत्रकार दिनेश घरडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. अधिक माहितीसाठी प्रमोद सोमकुंवर (मो. ९३७३६ १७११४) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# समाजाच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी अर्थसंकल्पाचा अभ्यास आवश्यक : बी.बी. मेश्राम



**छत्रपती संभाजीनगर :** फुले, शाहू, आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित १८० व्या शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेत संचालक बी. बी. मेश्राम यांनी समाजाच्या आर्थिक नाड्या बळकट करण्यासाठी अर्थसंकल्पाचा सखोल अभ्यास करण्याचे आवाहन केले.

ते म्हणाले की, ओबीसी, एससी, एसटी व इतर संवैधानिक समूहांना लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थसंकल्पीय तरतुदी मिळतात का, याचा अभ्यास करून जनजागृती करणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'सुशिक्षित करा, संघर्ष करा आणि संघटित करा' या विचारानुसार प्रशिक्षित व अभ्यासू कार्यकर्ते घडविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. यावेळी पंडित गायकवाड, ॲड. राहुल डी. गायकवाड, शशिकांत काळे, ॲड. सुनीलकुमार नागवंश यांनी मार्गदर्शन केले. प्रा. विलास कटारे यांनी प्रास्ताविक केले, ॲड. विलास रामटेके यांनी संचालन, तर ॲड. सुनीलकुमार नागवंश यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एआय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648